cmyk

## संपादकीय

### शिल्पकलेचा सन्मान म्हणजे महाराष्ट्राचा गौरव

शिल्पकलेतील अतुलनीय योगदानासाठी ज्येष्ठ पत्रकार राम सुतार यांची 'महाराष्ट्रभूषण पुरस्कार २०२४' साठी झालेली निवड हा यथोचित सन्मानच म्हटला पाहिजे. महाराष्ट्राचा सर्वोच्च नागरी सन्मान म्हणून महाराष्ट्र भूषण ओळखला जातो. हा पुरस्कार राम सुतार यांना जाहीर झाल्याने एका व्रतस्थ शिल्पकाराबरोबरच शिल्पकलेचाही गौरव झाला आहे, असे म्हटल्यास ते अधिक संयुक्तिक ठरेल.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### मणिपूरात न्यायाधीशांची समिती पोहचली

इंफाळः सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांचा समावेश असलेले एक शिष्टमंडळ न्यायमूर्ती बीआर गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती एमएम सुंदरेश, न्यायमूर्ती केव्ही विश्वनाथन आणि न्यायमूर्ती एन कोटीश्वर सिंह शनिवारी मणिपूरला पोहोचले आहेत. शिष्टमंडळाने चुराचंदपूर येथे मणिपूरमधील वांशिक हिंसाचाराच्या निर्वासितांची भेट घेतली. तसेच मदत छावण्यांना भेट दिली. यानंतर शिष्टमंडळ बिष्णुपूरमधील मोईरांग कॉलेजमध्ये पोहोचले. न्यायमूर्ती गवई यांनी चुराचंदपूरमध्ये २९५ कायदेशीर सेवा शिबिरे, आरोग्य शिबिरे आणि कायदेशीर मदत क्लिनिकचे उद्घाटन केले. ते म्हणाले आपल्या संविधानाचे उद्दिष्ट सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्रदान करणे आहे. त्याच वेळी, न्यायमूर्ती कोटिश्वर सिंह म्हणाले मला विश्वास आहे की एक दिवस मणिपूरची भरभराट होईल.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३२८ | रविवार, दि.२३ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# नाफेडच्या तूर नोंदणीकडे शेतकऱ्यांची पाठ

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्य शासनाच्या हमीभाव खरेदी केंद्रावर नोंदणी करूनही अनेक शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी झाली नाही. त्यामुळे अगोदरच शेतकऱ्यात असंतोष आहे. त्यात शासनाने हमी भावाप्रमाणे तुरीची खरेदी केंद्र सुरु करण्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु केली आहे. मात्र याला शेतकऱ्यांकडून प्रतिसाद मिळत नसल्याचे दिसत आहे. दि. २४ मार्च पर्यंत शेतकऱ्यांना तुरिची नोंदणी करता येणार आहे.**



शासनाच्या तूर खरेदी नोंदणीकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे. या वर्षी शासनाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरु केले होते. या करिता देखील शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली होती. मात्र अत्यंत कासवगतीने ही सोयाबीन खरेदी झाली. बारदाना नसल्याने अनेक दिवस खरेदी बंद राहिली. याचा फटका शेतकऱ्यांना बसला. नोंदणी करूनही शेतकऱ्यांचे सोयबीन शासनाने खरेदी केले नाही. यात मराठवाड्यात अडीच लाख शेतकऱ्यांना शासनाने वाऱ्यावर सोडले होते. सोयाबीन पाठोपाठ आता शासनाने हमी भावाने तुरीची खरेदी करण्यासाठी प्रक्रिया सुरु केली आहे. २४ जानेवारी ते २४ मार्च या कालावधीत शेतकऱ्यांची नोंदणी करून घेतली जात आहे. ही मुदत संपण्यासाठी केवळ तीन दिवसच शिल्लक राहिले आहेत. मात्र शासनाच्या खरेदीकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवल्याचे चित्र दिसत आहे.

## बीडमधून आणखी एक गुंड तडीपार

बीड । प्रतिनिधी

अवैधरित्या घातक शस्त्र बाळगणे आणि एकूण ०६ प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल असलेला सराईत गुन्हेगार राहुल प्रकाश तुपे वय २७ वर्षे रा. शिरापुर ता.जि. बीड ह. मु. गोविंद नगर, बीड यास बीड जिल्ह्यातून तडीपार केल्याचा आदेश काढण्यात आला आहे.



हा धोकादायक व सराईत गुन्हेगार असल्याने त्याला बीड जिल्ह्याच्या सिमा हद्दीतून दोन वर्षाकरीता हद्दपार करण्याचा प्रस्ताव शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एम. बी. खेडकर यांनी मा. पोलीस अधीक्षक यांच्या मार्फत मा. उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, उपविभाग बीड यांना सादर केला होता. सदर प्रस्तावावरुन उपविभागीय दंडाधिकारी कविता जाधव यांनी राहुल प्रकाश तुपे यास बीड जिल्ह्यातून एक वर्षाकरीता हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारोती खेडकर, पोह. परजने, पोह. आघाव,गाडे, पोअं. कांदे, पोअं. सारणीकर, बहिरवाळ यांनी केलेली आहे.

# दंगलखोरांची प्रॉपर्टी विकून नुकसान भरपाई वसूल करणार

## देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडवर, दिला कठोर कारवाईचा इशारा

**नागपूर । प्रतिनिधी**

**नागपूर येथे हिंसाचारादरम्यान झालेली नुकसान भरपाई येत्या ३ ते ४ दिवसांत दिली जाईल. या हिंसाचारात जेवढे नुकसान झाले आहे, त्याची सर्व नुकसान भरपाई दंगेखोरांकडून वसूल करण्यात येईल. आणि ती दिली नाही तर संपती जप्त केली जाईल. तसेच अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडल्यास कठोरात कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला देण्यात आल्या आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी शनिवार पत्रकार परिषदेत सांगितले.**

सोशल मीडियावरील वादग्रस्त पोस्टनंतर नागपूरमध्ये हिंसाचार घडला. यातील १०४ आरोपींची ओळख पटली आहे. यामधील ९२ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच लवकरात लवकर संचारबंदीत शिथिलता आणली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नागपूर हिंसाचार प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांसोबच्या बैठकीत शनिवारी पान २ वर



### अफवा पसरवणाऱ्यांवरही होणार कारवाई

जो व्यक्ती दंगल करताना दिसतोय किंवा दंगलखोरांना मदत करताना दिसतोय, अशा प्रत्येकावर कारवाई करण्याच्या मानसिकतेत पोलीस आहेत. मोठ्याप्रमाणावर सोशल मिडिया ट्रॅकिंग करुन ज्या लोकांनी दंगल भडकावण्यासाठी चिथावणी दिली, त्यांनाही सहआरोपी केले जाणार आहे. आतापर्यंत एकूण ६८ पोस्ट डिलिट करुन कारवाई करण्यात आली आहे. ज्या लोकांनी भडकावणारे पॉडकास्ट केले, अफवा पसरवल्या, अशा सर्व लोकांवर कारवाई होईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## नागपूर दंगलीत पहिल्या बळीची नोंद, उपचार सुरु असताना तरुणाचा मृत्यू

### महिला कॉन्स्टेबलशी अभद्र व्यवहार झालेला नाही

नागपूर हिंसाचारावेळी महिला पोलीस कर्मचाऱ्यांसोबत दंगलखोरांनी अभद्र कृत्य केल्याची माहिती प्रसारमाध्यमांनी दिली होती. मी याबाबत पोलीस आयुक्तांना विचारले. त्यांनी सांगितले की, महिला पोलीस कर्मचाऱ्यांशी कोणताही अभद्र व्यवहार झालेला नाही. मात्र, दंगलखोरांनी त्यांना घेरुन त्यांच्यावर दगडफेक केली, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



**नागपूरमध्ये उसळलेल्या दंगलीतील पहिला बळी गेला आहे. या दंगलीत गंभीररित्या जखमी झालेल्या तरुणाचा नागपूरच्या मेयो रुग्णालयात मृत्यू झाला आहे. यामुळे रुग्णालय परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे.**

इरफान अन्सारी (वय ४०) असे या दंगलीत बळी गेलेल्या तरुणाचे नाव आहे. तो नागपूरच्या वंदे नवाज नगरचा रहिवासी होता. सोमवारच्या रात्री (दि. १७ मार्च २०२५) ११ वाजण्याच्या सुमारास इरफान हा इटारसीला जाण्यासाठी रेल्वे स्थानकाकडे आटोरिक्षाने निघाला होता. गीतांजली थेटर चौकात हिंसाचार सुरु असल्याने ऑटो चालकाने त्याला पुढे सोडण्यास नकार दिला. त्यानंतर इरफान अन्सारी रेल्वे स्थानकाकडे जाण्यासाठी पायी निघाला पान २ वर

## मराठवाडा, विदर्भात पावसाचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

**ढगाळ हवामानामुळे राज्यातील बहुतांशी भागात तापमानात घट दिसून आली. आजही अनेक ठिकाणी अंशतः ढगाळ हवामान होते. तर हवामान विभागाने आज आणि उद्या राज्यातील काही भागात हलक्या पावसाचा अंदाज दिला.**

रविवारी सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशिव जिल्ह्यात काही ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह हलक्या पावसाचा अंदाज दिला आहे. सोमवारपासून राज्यातील पावसाळी वातावरण निवळेल आणि उष्णता वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला. मागील तीन दिवसांपासून राज्यातील अनेक भागात ढगाळ वातावरण असल्याने उन्हाचा चटकाही पान २ वर

# अजित पवार दोन एप्रीलला घेणार अधिकाऱ्यांची बैठक

## जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यापासून देणार दुसऱ्यांदा भेट



**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्याचे पालकमंत्रीपद सांभाळल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार दोन महिन्यांनी दुसऱ्यांदा बीडमध्ये येणार आहेत. २ एप्रिल रोजी संध्याकाळी ते अधिकाऱ्यांच्या बैठका घेणार आहेत. यापूर्वी श्री. पवार यांनी ता. ३० जानेवारीला जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली होती.**

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची विस्कटलेली घडी, संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे निर्माण झालेला आक्रोश अशा विविध कारणांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वत:कडे घेतले. पद घेतल्यानंतर पवार पहिल्यांदा ३० जानेवारीला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी शहरात आले होते. सर्व विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक व जिल्हा नियोजन समितीची बैठक त्यांनी घेतली. यावेळी जिल्हा नियोजन समितीमधील निधीच्या अनियमिततेच्या संबंधीच्या तक्रारींची चौकशीचे आदेशही त्यांनी दिले. चौकशीचा आढावा त्यांनी अधिकाऱ्यांना पान २ वर

# राष्ट्रवादी कॉँग्रेस साजरा करणार 'महाराष्ट्र महोत्सव'

**मुंबई । प्रतिनिधी**


**संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला यंदा ६५ वर्षे पुर्ण होत असून राष्ट्रवादी कॉँग्रेसच्यावतीने राज्यभरात 'महाराष्ट्र महोत्सव' साजरा करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिली. प्रदेश कार्यालयात पक्षाच्या विविध फ्रंटल व सेल राज्यप्रमुखांची बैठक प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी घेतली व पक्षाच्या प्रदेश फ्रंटल व सेलच्या राज्य प्रमुखांना महाराष्ट्र महोत्सवाचा कार्यक्रम दिला.**



महाराष्ट्राच्या दैदिप्यमान इतिहासाची ओळख नव्या पिढीला करून देणारे कार्यक्रम या महाराष्ट्र महोत्सवात आयोजित करावेत अशा सूचनाही सुनिल तटकरे यांनी प्रदेश पदाधिकार्यांना यावेळी दिल्या. 'महाराष्ट्र महोत्सवा' निमित्त राजधानी मुंबईत १ ते ३ मे दरम्यान विविध सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्यानंतर पुढील पंधरा दिवसात नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, अमरावती या प्रशासकीय विभागात स्थानिक मराठी संस्कृतीचा ऐतिहासिक ठेवा आणि ओळख अधोरेखित करणारे पान २ वर

## हिंदीतील ज्येष्ठ कवी विनोद कुमार शुक्ल यांना ज्ञानपीठ पुरस्कार






**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**हिंदीतील ज्येष्ठ कवी आणि साहित्यिक विनोद कुमार शुक्ल यांची यंदाच्या ज्ञानपीठ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार भारतातील सर्वोच्च साहित्य सन्मान मानला जातो. नवी दिल्ली येथे शनिवारी (दि.२२ मार्च) याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली.**

विनोद कुमार शुक्ल यांचा जन्म १ जानेवारी १९३७ रोजी छत्तीसगडमधील पान २ वर

## दिशा सालियन मृत्यू प्रकरणी २ एप्रिल रोजी मुंबई हायकोर्टात सुनावणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**तब्बल ५ वर्षानंतर पुन्हा एकदा दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची चर्चा होत आहे. दिशा सालियन हिच्या वडीलांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. दरम्यान त्यांनी उबाठा नेते, आमदार आदित्य ठाकरे यांच्यांवर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणात बुधवार २ एप्रिल २०२५ रोजी सुनावणी होणार असल्याचे समोर आले आहे.**



दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची माजी व्यवस्थापक दिशा सालियन हिचे पान २ वर

### आदित्य ठाकरेंना अटक करा–खा.नारायण राणे

भाजप खासदार नारायण राणे यांनी या प्रकरणात मला मिलिंद नार्वेकर यांचा फोन आला होता, असा दावा केला आहे. ते शनिवारी पत्रकार परिषदेत बोलत होते. खासदार नारायण राणे पुढे म्हणाले, ''उद्धव ठाकरेंनी मला दोन फोन केले होते. दिशा सालियन घटना घडली, तेव्हा मला मिलिंद नार्वेकर यांचा फोन आला होता. नार्वेकर म्हणाले होते की, दादा साहेबाना बोलायचे आहे. त्यानंतर उद्धव ठाकरेंनी फोन घेतला आणि म्हणाले की, तुम्हाला मुले आहेत मलादेखील आहेत. आदित्य ठाकरेंचा उल्लेख करू नका, अशी विनंती करतो. यानंतर मी उद्धव ठाकरेंना म्हणालो होतो, मी तुमच्या मुलाचे नाव घेतले नाही. तुम्ही प्रेस घेताना उल्लेख टाळाल तर बरे होईल.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८८.०० क्विंटल | २,००० | ३,१९१ | २,६२५ |
| ज्वारी/हायब्रिड: १३१.०० क्विंटल | १,७०० | ३,९४० | २,४४६ |
| मका/लोकल:२४.०० क्विंटल | २,१९३ | २,१९३ | २,१९३ |
| तूर : ७.५० क्विंटल | ६,८२१ | ६,९४१ | ६,८८१ |
| उडीद : ६.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ७५.०० क्विंटल | २,००१ | ३,०५१ | २,६३९ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ३८.०० क्विंटल | ३,९५० | ४,००० | ३,९७५ |
| हरभरा: ५४.०० क्विंटल | ५,०७१ | ५,२६० | ५,१६२ |

# सीबीएसई पॅटर्न मराठी शाळांसाठी घातक

## मराठी शाळा संपवण्याचा नियोजित डाव, निर्णयाचा फेरविचार करण्याची वर्षा गायकवाड यांची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र सरकारने राज्यातील सरकारी शाळा सीबीएसई पॅटर्नवर पुढील शैक्षणिक वर्षापासून आणण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपा युती सरकारचा हा निर्णय राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ व बालभारतीच्या अस्तित्वावर गदा आणणारा आहे. सरकारने या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी माजी शालेय शिक्षण मंत्री खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे. राज्य सरकारच्या निर्णयावर तोफ डागत खासदार प्रा. वर्षा गायकवाड यांनी सरकारला काही प्रश्न विचारले आहेत.**






वर्षा गायकवाड पुढे बोलताना म्हणाल्या की, हा निर्णय घेण्याआधी शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, मुख्याध्यापक आणि इतर क्षेत्रातील जाणकारांशी सविस्तर चर्चा करण्यात आली होती का? एप्रिलपासून हा पॅटर्न लागू करायचा आहे, तर शिक्षकांना आणि शाळांना यासाठी योग्य प्रशिक्षण देण्यात आले आहे का? सीबीएसई पॅटर्न लागू केल्यावर मराठी शाळा आणि मराठी साहित्य, कला व संस्कृतीचा समावेश विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात कसा केला जाणार आहे? राज्याच्या पाठ्यपुस्तक निर्मितीची जबाबदारी पार पाडणाऱ्या बालभारतीचे भविष्य पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# शिल्पकलेचा सन्मान म्हणजे महाराष्ट्राचा गौरव

शिल्पकलेतील अतुलनीय योगदानासाठी ज्येष्ठ पत्रकार राम सुतार यांची 'महाराष्ट्रभूषण पुरस्कार २०२४' साठी झालेली निवड हा यथोचित सन्मानच म्हटला पाहिजे. महाराष्ट्राचा सर्वोच्च नागरी सन्मान म्हणून महाराष्ट्र भूषण ओळखला जातो. हा पुरस्कार राम सुतार यांना जाहीर झाल्याने एका व्रतस्थ शिल्पकाराबरोबरच शिल्पकलेचाही गौरव झाला आहे, असे म्हटल्यास ते अधिक संयुक्तिक ठरेल.

राम सुतार यांचा जीवनप्रवास तसा थक्क करणाराच म्हणावा लागेल. फेब्रुवारी १९२५ रोजी महाराष्ट्रातील धुळ्यामधील गोंदूर या छोट्याशा गावी एका गरीब कुटुंबात जन्मलेले राम सुतार हे अगदी वयाच्या शंभरीतही शिल्पकलेमध्ये स्वत:ला वाहून घेतात, यावरूनच त्यांची या कलेबद्दलची आस्था, प्रेम आणि निष्ठा दिसून येते. मुंबईच्या 'जेजे स्कूल ऑफ आर्ट'मध्ये त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. १९५२ ते ५८ या काळात तिशीतील राम सुतार यांनी आधी अजिंठा-वेऊळ येथील शिल्पांच्या डागडुजीचे आणि नंतर पंचवार्षिक योजनांचे लाभ सांगणारी लघुशिल्पे बनविण्याचे काम सरकारी नोकरीत राहून केले. राम सुतार यांनी १९६० पासून त्यांचा स्वतंत्र स्टुडिओ उभारला आणि त्यांच्या कामाची व्याप्ती वाढतच गेली. आजपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, इंदिरा गांधी, राजीव गांधी अशा अनेक दिग्गज नेत्यांच्या शिल्पांची निर्मिती त्यांनी केली आहे. जिवंतपणा हे त्यांच्या शिल्पकलेचे वैशिष्ट्ये होय. आपल्या जादुई हाताची ही किमया त्यांच्या अनेक शिल्पांमध्ये दिसून येते. मन ओतून आणि सर्वस्व पणाला लावून त्यांनी शिल्पे कशी घडवली, याची प्रचितीच हे सगळे पाहिल्यावर येते. संसद भवनाच्या आवारातील मौलाना आझाद, इंदिरा गांधी, राजीव गांधी, गोविंदवल्लभ पंत आणि जगजीवनराम अशा अनेक मूर्ती घडवताना त्यांनी जी सफाई दाखवली, त्यालाही तोड नाही. १० ते १८ फुटाचे शिल्प असो किंवा त्याहून मोठे शिल्प असो. ते घडवताना कोणत्या बाबींची दक्षता घेतली पाहिजे, हे सुतार यांची कला सांगते. आज फ्रान्स, इटली, अर्जेंटिना, रशिया, इंग्लंड या ठिकाणीदेखील त्यांनी साकारलेली शिल्पे उभी आहेत. नेत्यांच्या जीवनातील प्रसंगांचे दर्शन घडविणारी भित्तिशिल्पे हेही सुतार यांचे एक वैशिष्ट्ये म्हणता येईल.

गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा १८२ मीटर उंचीचा पुतळा हा तर त्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड म्हणता येईल. जगातील सर्वांत उंच पुतळा म्हणून या पुतळ्याकडे पाहिले जाते. गुजरातसह देशातीलच नव्हे, तर जगभरातील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या या पुतळ्याकरिता त्यांनी जे कष्ट उपसले, त्याला तोड नाही. शिल्पकला ही केवळ एक कला नसून, ऐतिहासिक दस्तऐवजच आहे. राम सुतार यांच्यासारख्या महान शिल्पकाराने आपल्या कलेच्या माध्यमातून भारताच्या या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाला अमरत्व बहाल केले आहे. राम सुतार यांनीं आपल्या शिल्पकलेतून महाराष्ट्राचा आणि देशाचा गौरव वाढविला आहे. त्यांच्या कलाकृती जगभरात भारताचे प्रतिनिधीत्व करतात. त्यामुळेच महाराष्ट्र भूषण पुरस्कारासाठी त्यांची सर्वानुमते निवड करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांनी मांडलेली ही भावना सार्वत्रिकच म्हणायला हवी. अरबी समुद्रातील शिवस्मारक, इंदू मिलचे प्रस्तावित आंबेडकर स्मारक यांसह अनेक स्मारके सुतार यांच्याच कल्पनेतूनच साकारत आहेत. ही स्मारकेदेखील महाराष्ट्रासह संपूर्ण देशाकरिता एक अभिमानास्पद ठेवा ठरतील, यात कोणताही संदेह वाटत नाही. काही दिवसांपूर्वीच त्यांना केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाकडून देण्यात येणारा २०१६ या वर्षासाठीचा टागोर पुरस्कार जाहीर झाला. याशिवाय १९९९ मध्ये पद्मश्री, तर २०१६ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने राम सुतार यांना गौरविण्यात आले. आता महाराष्ट्र भूषण पुरस्कारामुळे त्यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. पुरस्कारानंतर हा महाराष्ट्रभूषण नव्हे, तर हिंदुस्थान भूषण पुरस्कार असल्याच्या भावना राम सुतार यांनी व्यक्त केल्या आहेत. यातूनच त्यांच्या मनातील या पुरस्काराचे स्थान काय, याची प्रचिती येते. खरे तर शिल्पकला ही अत्यंत सुंदर आणि अवघड कला आहे. एखादा पुतळा वा शिल्प घडवताना कलाकाराला त्याच्याशी समरस व्हावे लागते. तन, मन, धन अर्पून केवळ संबंधित शिल्पाचाच विचार करावा लागतो. राम सुतार यांच्याबाबत बोलायचे झाल्यास या पलीकडे जाऊन त्यांनी शिल्पे घडवली आहेत. आज ते शंभर वर्षांचे आहेत. या वयातही त्यांच्या मनातील पुतळा घडविण्याची वा साकारण्याची ऊर्मी यत्किंचितही कमी झालेली नाही. उलट ती वाढत असल्याचेच दिसून येते. खरा कलाकार कसा असतो आणि त्याची कला किती आत्मिक असते, याचेच हे लक्षण होय. म्हणूनच 'महाराष्ट्रभूषण पुरस्कारा'च्या यादीत एका महनीय शिल्पकाराची भर पडली हे मान्य करावेच लागेल.

# शेतकरी संघटनेच्या न्यायालयीन आणि रस्त्यावरील लढाईमुळे शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्तीला यश

## शेतकऱ्यांनी कर्जे भरू नयेत-कालिदास आपेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**देवेंद्र फडणवीस सरकारला शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीबद्दल उपरती झाली असून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्तीच्या अंमलबजावणीसाठी माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याचे विधानसभेत जाहीर केले. शेतकरी संघटनेच्या न्यायालयीन आणि रस्त्यावरील लढाईला अभूतपूर्व यश मिळाल्याने शेतकऱ्यांनी कुठलीही कर्जे भरू नयेत असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष तथा भारतीय किसान संघ-परिसंघ नवी दिल्लीचे सचिव कालिदास आपेट यांनी केले.**

सन २०१४ साली सत्तेवर असताना देवेंद्र फडणवीस सरकारने १८ जून २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना जाहीर केली. या योजनेनुसार शेतकऱ्यांचे १.५ लाख रुपये सरसकट कर्ज माफ करण्याचा निर्णय केला होता. दीड लाखाच्यावरील रकमेसाठी बँकेसोबत समझोता करून उर्वरित रक्कम भरल्यानंतर दीड लाख रुपये दिले जातील.तसेच नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय करण्यात आला.तरिही दीड लाख रुपयांच्या कर्जमाफी योजनेस पात्र असलेल्या ५.५६ लाख शेतकऱ्यांना वंचित ठेवून देवेंद्र फडणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली होती. याविरोधात खिर्डी विविध कार्यकारी सहकारी (विकास)सेवा संस्था ता. श्रीरामपूर जि.अहमदनगर येथील सभासद कर्जदार बजरंग भाऊसाहेब पारखे आणि मयत कांतीबाई हळनोर यांचे वारस साहेबराव हळनोर यांनी छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजनेत आम्ही पात्र असतानाही देवेंद्र सरकारने पोर्टल बंद केल्याने १.५ लाख रुपये सरसकट कर्ज माफीचा लाभ मिळाला नाही. अशी तक्रार औरंगाबाद उच्च न्यायालयात शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष अॅड.अजित काळे यांच्यामार्फत ९८०८/२२



क्रमांकाची याचिका दाखल केली.सुनावणी दरम्यान अॅड.अजित काळे यांनी केलेला युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरुन याचिका कर्त्यांना सरसकट १.५ लाख रुपये कर्जमाफी करण्याचा आदेश औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती रविंद्र घुगे आणि अरुण पेडणेकर यांनी दिला. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आणि खिर्डी सेवा सहकारी (विकास) सेवा संस्थेने बजरंग भाऊसाहेब पारखे आणि मयत कांतीबाई हळनोर यांचे वारस साहेबराव हळनोर यांना न्यायालयीन आदेशानंतरही लाभ दिला नाही. अॅड.अजित काळे,अॅड.साक्षी काळे, अॅड.प्रतिक तलवार यांनी याविरोधात न्यायालयाच्या अवमानाची याचिका क्रमांक १५०/२३ श्रीमती विभा कंकनवाडी आणि एस.जी. चपळगांवकर यांच्या न्यायालयात दाखल केली.अवमान याचिकेची सुनावणी चालू असताना अशाच पद्धतीने महाराष्ट्रात लाखो शेतकऱ्यांना १.५ लाख रुपये सरसकट कर्जमाफीचा लाभ मिळाला नसल्याचे सांगितले.त्याच कारणासाठी शेतकऱ्यांना पुन्हा न्यायालयात यावे लागू नये. असा युक्तिवाद अॅड अजित काळे यांनी न्यायालयासमोर केला. सरकारी वकील अॅड. कार्लेकर यांनी सहमती दर्शविली. न्यायालयाने सकारात्मक विचार करून अॅड. अजित काळे यांचे म्हणणे ग्राह्य धरले.दरम्यान उद्धव ठाकरे सरकारने दोन लाखापर्यंतची महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती योजना राबविली. तरीही देवेंद्र सरकारने जाहीर केलेल्या दीड लाखाच्या योजनेतील ६.५६ लाख शेतकऱ्यांना पात्र असूनही लाभ मिळाला नव्हता. म्हणून शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष अॅड.अजित काळे यांनी औरंगाबाद खंडपीठात न्यायालयीन लढाई चालूच ठेवली.

### रस्त्यावरील लढाईला अभूतपूर्व यश

सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्तीचे पुन्हा आश्वासन दिले. शेतकऱ्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर विश्वास ठेवून मतदान केले.आता मुख्यमंत्री होऊन चार महिने उलटले तरीही शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीबाबत देवेंद्र फडणवीस बोलायला तयार नव्हते.१९ मार्च २०२५ रोजी शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथदादा पाटील, उपाध्यक्ष अॅड.अजित काळे यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्तीसाठी शेतकरी संघटनेने पुणे येथील कृषी आयुक्तालयावर शेतकऱ्यांचा विराट मोर्चा काढला.या मोर्चाची दखल घेऊन उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमुक्ती करण्यासाठी माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात समिती नेमण्याचा निर्णय केला आहे. मुनगंटीवार समितीने एका महिन्यात कर्जमुक्ती बाबत अहवाल द्यावा असेही अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची लगेच कर्जमुक्ती होणार असल्याने शेतकऱ्यांनी कुठलीही कर्जे भरू नयेत.असे आवाहन शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट यांनी केले आहे.

# सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या चारजणां विरोधात माजलगांव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांना दि २१ मार्च शुक्रवार रोजी सायंकाळी ९:०० वाजण्याच्या सुमारास गोपनिय माहीती मिळाली की,शुभम साबळे,ओंकार घोडके, शुभम पाटील,विशाल सोळंके यांनी दोन समाजात तेढ निर्माण होईल अशा आक्षेपार्ह पोस्ट त्यांचे सोशल मिडीयावरील इंस्टाग्राम वरुन प्रसारीत केले आहेत.अशी माहीती मिळाल्याने पोलीसांनी नमुद इसमांचे इंस्टाग्राम खाते तपासले असता पोलीसांना नमुद इसमांनी दोन समाजात तेढ निर्माण होईल अशा प्रकारच्या आक्षेपार्ह पोस्ट त्यांच्या सोशल मिडीयावरील इंस्टाग्रामवरुन



प्रसारीत केले असल्याचे मिळून आल्याने नमुद चार इसमांविरुध्द पोलीस अंमलदार अमोल कदम यांच्या फिर्यादीवरुन गु.र.नं. ११७/२०२५ कलम ६६ माहीती तंत्रज्ञान अधिनियम-२००० सह कलम ३५३ (२) भारतीय न्याय संहीता प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ करीत आहेत. नागरीकांनी सोशल मिडीयावर पोस्ट करतांना सामाजिक भावना लक्षात घेवुन पोस्ट करावे, संवेदनशील राहावे, कोणीही विनाकारण समाजात तेढ निर्माण होईल अशा प्रकारच्या पोस्ट करुन सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करु नये असे आवाहन माजलगांव पोलीसांनी केले आहे.

# पोलीस बांधवांकडून नांदुर घाट पोलीस चौकी येथे इफ्तार पार्टीचे आयोजन



**नांदूर घाट । प्रतिनिधी**

देशामध्ये पवित्र रमजान महिन्यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत असतात मुस्लिम समाजाचा हा पवित्र सण मुस्लिम समाजातील बांधव आनंदाने साजरा करत असतात मुस्लिम समाजाच्या उपवासाच्या महिन्यामध्ये इफ्तार पार्टीमार्फत हा महिना मुस्लिम समाजाच्या बांधवांसाठी हिंदू बांधव देतात त्यातच नांदुर घाट येथे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नांदूर घाट येथील मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन दूरक्षेत्र पोलीस चौकी नांदुर घाट येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन केज पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक वैभव पाटील. पोलीस सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक फारूक कादरी. पोलीस कॉन्स्टेबल राजू वाघमारे. बीट अंमलदार राजू वंजारे. पोलीस अंमलदार शमीम पाशा यांनी इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. या पार्टीप्रसंगी नांदूर घाट येथील समस्त मुस्लिम समाज व सर्वच क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. आदर्श उपक्रमामुळे खाकी वर्दीतील माणुसकी दिसून आली उपक्रमामुळे पोलीस प्रशासनाचे कौतुक होताना पाहायला मिळत आहे.

# न्यायालयामध्ये प्रकरण सुरू असताना दिनेश राठी यांच्याकडून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल ?

**जालना । प्रतिनिधी**

**स्टील कंपनी जाग्याच्या वाद प्रकरणी न्यायालयामध्ये सुरू असताना आयकॉन कंपनीचे दिनेश कांतीलाल राठी यांच्याकडून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आमच्या गट नं.५८ मधील जमिनीवर बेकायदेशिरपणे बाहेरील अज्ञात लोकांनी दिनेश कांतीलाल राठी यांच्या सांगण्यावरून आमच्या मालकीच्या रितसर जागेवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करून आम्हाला जिवे मारण्याची धमकी देत असल्याबाबत कपील इन्डस्ट्रीज, राजयोग स्टील अॅण्ड अलाय प्रा.लि. या कंपनीच्या मालकाने २०२३ मध्ये तक्रार अर्ज पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजी नगर व पोलीस अधीक्षक जालना व जिल्हाधिकारी तसेच पोलीस निरीक्षक चंदनझीरा पोलीस स्टेशन यांच्याकडे करण्यात आला होता परंतु या प्रकरणी संबंधित पोलीस विभागाने याकडे दुर्लक्ष केल्यामुळे हा सर्व प्रकार आता घडला आहे.**

याबाबत मंमादेवी कंपनी संतोष मुंदडा बोलताना म्हणाले की सर्व प्रकरण न्यायालयामध्ये सुरू असताना आयकॉन कंपनीचे दिनेश राठी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आठ दिवसापूर्वी गुन्हा गुन्हा दाखल केला आहे. असा गुन्हा दाखल करता येत नाही असे बोलल्या जात आहे. याप्रकरणी आयकॉन कंपनीचे मालकाला आम्ही फक्त २४ लाख रुपये रॉयल्टी चे पैसे भरण्याबाबत मागणी केली होती. तसेच सदरील कंपनी त्या जागेवर आहे मग बनावट प्रकार कोणी केला त्याचा पण विचार करणे गरजेचे आहे. सन२०२३ चंदनझीरा पोलिसांनी कारवाई ना केल्यामुळे आम्हाला न्यायालयामध्ये जावा लागले अशी पण माहिती संतोष मुंदडा मुंबादेवी कंपनी जागा मालकाकडून देण्यात आली. तसेच आयकॉन कंपनी १५ ते २० वर्षापासून आमच्या सव्वा पाच एकरवर या



जागेवर कंपनी सुरू आहे तरीपण आयकॉन कंपनीच्या मालकांनी होळीच्या एक दिवस अगोदर पोलीस स्टेशनला तक्रार देऊन गुन्हा दाखल केला याप्रकरणी न्यायालयाने जामीन मंजूर केली आहे असे मंमादेवी कंपनीचे संतोष मुंदडा यांच्याकडून सांगण्यात आले. आमच्या मालकीची गट कं. ५८ मध्ये कपील इन्डस्ट्रीज जालनाच्या मालकीचे क्षेत्र ५ हेक्टर ६२.५०आर, २. बालासाद रामरतन लोया यांच्या मालकीचे क्षेत्र ३ हेक्टर ०५ आर आणि ३. राजयोग स्टील अॅण्ड अलाय प्रा.लि. यांच्या मालकीचे क्षेत्र २ हेक्टर ५६.५० आर या प्रमाणे जमीन असून या जमिनीवर आमचा पुर्णपणे विकत घेतल्यापासुन रितसर ताबा आहे आणि त्या जागेवर आमच्या मालकीचे होडींग बोर्ड सुध्दा लावलेले आहेत. त्या ठिकाणी आमच्या देखरेखीमध्ये नियमीत सेक्युरिटी गार्ड असतात, परंतु दि. १७/०७/२०२३ रोजी सायं. अंदाजे ०७ ते १० दरम्यान काही अज्ञातांनी त्या ठिकाणी येवून दिनेश कांतीलाल राठी यांच्या सांगण्यावरून आमच्या मालकीचे साधनसामग्री जसे की, कंटेनरचे कुलूप तोडून अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला, व आम्हाला जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या, या जमिनीवर आणि येथील साधनसामग्रीवर आमचा पुर्णपणे रितसर ताबा आहे. त्याच प्रमाणे आमच्या मालकीची प्लॉट नं. एफ-१५ मधील मंमादेवी स्टिल अॅलाय प्रा.लि. जालना या प्लॉटवर सुध्या आमचा रितसर ताबा असून या ठिकाणी देखील होडींग बोर्ड लावलेले आहे, ज्याची किंमत रु.१,००,०००/- इतकी आहे, परंतु दि. १७/०७/२०२३ रोजी रात्री अंदाजे ०७ ते १० दरम्यान आमचा होर्डींग बोर्ड नावे मंमादेवी स्टिल अॅलाय प्रा.लि. काढून टाकला व परत मागण्यास गेलो असता देत नाही म्हणून सांगितले. दिनेश कांतीलाल राठी यांच्या सांगण्यावरून ५० पेक्षा जास्त अज्ञातांनी आमच्या मालकीच्या रितसर ताबा असलेल्या ठिकाणी येवून आम्हाला धमकावून आणि जिवे मारण्याची धमकी देवू गेले, त्यामुळे आमच्या जिवीतास धोका असून पुढील संरक्षण दयावे व आमच्या जिवाचे काही बरेवाईट झाल्यास त्यासाठी दिनेश कांतीलाल राठी हे जबाबदार राहतील. प्रकरणात दिनेश कांतीलाल राठी आणि अज्ञातां विरूध्द तात्काळ कायदेशिर कारवाई करून आम्हाला संरक्षण देण्यात यावे अशी मागणी पण पुरूषोत्तम तोष्णीवाल, मंमादेवी कंपनीचे संतोष मुंदडा, बालाप्रसाद लोया, यांनी पोलीस अधीक्षक जालना जिल्हाधिकारी, पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे रीतसर मागणी केली होती.

## पान १ वरून...

### दंगलखोरांची प्रॉपर्टी विकून

(दि.२२) आढावा घेतला. त्यानंतर ते नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. नागपूर शांतिप्रिय शहर आहे. समाजकंठकांना आताच सरळ नाही केले तर, या पुढेदेखील राज्यात असे दंगे होतील. नागपूर हिंसाचार प्रकरणी पोलिसांनी, मोबाईल चित्रीकरण, पत्रकारांनी दिलेले चित्रीकरण यानुसार कारवाई केली आहे. या प्रकरणात आतापर्यंत ९२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींमध्ये १२ अल्पवयीन मुलांचादेखील समावेश आहे. त्यांच्यावर देखील कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्यांदाच नागपूर दौरा केला. तसेच हिंसाचाराबाबत वरिष्ठ पोलिस आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. त्यानंतर फडणवीसांनी पत्रकार परिषदेत घेत मोठे विधान केले आहे. या दंग्यामध्ये गाड्यांचे नुकसान झालं आहे, ३३ पोलीस जखमी झाले आहेत. हिंसाचारात सहभागी असलेल्यांना धडा शिकवल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. विशेषतः, पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना आम्ही सोडणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिला आहे.

---------

### दंगलखोरांची प्रॉपर्टी विकून

फ.असताना जमावाने त्याला घेरले आणि त्याच्यावर शस्त्रांनी वार केले. या हल्ल्यात इरफानला गंभीर दुखापत झाली होती, त्याच्या डोक्यावर, पाठीवर घाव होते. गंभीर जखमी अस्वस्थेत तो पोलिसांना दिसल्याने त्यांनी त्याला इंदिरागांधी रुग्णालयात अर्थात मेयो रुग्णालयात भरती केले. या ठिकाणी गेल्या सहा दिवसांपासून त्याच्यावर उपचार सुरु होते, शनिवारी त्याची मृत्यूशी झुंज अखेर थांबली.

----------

### राष्ट्रवादी काँग्रेस साजरा

विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आयोजित 'महाराष्ट्र महोत्सव' राज्यभरात पक्षाचा कार्यक्रम म्हणून साजरा करताना महाराष्ट्राची ओळख व संस्कृती अधोरेखित करणार्या संकल्पना सुचवण्याची विनंती प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी या बैठकीत केली. मुंबईसह राज्यभरातील सर्व सहा विभागात संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा १ मे दिन ''महाराष्ट्र महोत्सव' भव्यदिव्य स्वरूपात साजरा करण्याच्या सूचना सुनिल तटकरे यांनी केल्या. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसने १९ फेब्रुवारी रोजी युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त 'स्वराज्य सप्ताह' तर २७ फेब्रुवारी रोजी 'अभिजात मराठी भाषा दिन सोहळया'चे भव्यदिव्य आयोजन केले होते आणि आता संयुक्त महाराष्ट्र स्थापनेला ६५ वर्ष पूर्ण होत असल्याने 'महाराष्ट्र महोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण या भूमिकेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली वाटचाल करत असल्याचेही सुनिल तटकरे यांनी यावेळी सांगितले.

--------------

### अजित पवार दोन एप्रीलला

मुंबईला बोलावूनच घेतला. तत्पूर्वी त्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेबाबतही मुंबईत बैठक घेतली होती. मागच्या आठवड्यात त्यांनी बीडला विमानतळ उभारणीची घोषणा केली आहे. दरम्यान, आता २ एप्रिल रोजी अजित पवार बीडला येणार असल्याची माहिती, जिल्हाध्यक्ष अॅड. राजेश्वर चव्हाण यांनी दिली.

------------

### दिशा सालियन मृत्यू प्रकरणी २ एप्रिल

मृत्यू प्रकरण राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनले आहे. दिवंगत दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात २ एप्रिल २०२५ रोजी होणार आहे. सतीश सालियन यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकिलाने रिट याचिकेची प्रत दिली आहे.

-----------

### हिंदीतील ज्येष्ठ कवी विनोद

राजनांदगाव येथे झाला. सध्या ते रायपूर येथे वास्तव्यास आहेत. ५० हून अधिक वर्षांच्या साहित्यिक कारकिर्दीत त्यांनी कवितांपासून कथा-साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत आपली छाप उमटवली आहे. त्यांचा पहिला काव्यसंग्रह 'लगभग जय हिंद' हा १९७१ मध्ये प्रकाशित झाला होता. शुक्ल यांच्या 'नौकर की कमीज', 'खिलेगा तो देखेंगे' आणि 'दीवार में एक खिड़की रहती थी' या कादंबऱ्या आधुनिक हिंदी साहित्यातील अत्यंत महत्त्वाच्या कलाकृती मानल्या जातात. त्यांच्या 'पेड़ पर कमरा' आणि 'महाविद्यालय' या लघुकथासंग्रहांना वाचकांची मोठी पसंती मिळाली आहे. याशिवाय त्यांचे 'लगभग जय हिंद', 'वह आदमी चला गया गरम कोट पहनकर विचार की तरह', 'सब कुछ होना बचा रहेगा', 'अतिरिक्त नहीं', 'कविता से लंबी कविता', 'आकाश धरती को खटखटाता है' हे काव्यसंग्रह जागतिक स्तरावर नावाजले गेले आहेत.

-------------

### मराठवाडा, विदर्भात

कमी झाला. राज्यात बहुतांशी भागात तापमान सरासरी ३७ अंश ते ३८ अंशाच्या दरम्यान होते. राज्यातील तापमानातही चढ उतार कायम राहतील, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

---------

### सीबीएसई पॅटर्न मराठी

काय? सीबीएसईच्या अभ्यासक्रमात महाराष्ट्राचा इतिहास आणि थोर व्यक्तींचा उल्लेख फारच सामान्य पातळीवर असतो. मग आपल्या राज्यातील मुलांना गौरवशाली इतिहासाचा सखोल अभ्यास करण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली आहे का? यावर शालेय शिक्षण मंत्री यांनी खुलासा करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. शेवटी बोलताना वर्षा गायकवाड म्हणाल्या की, मराठी शाळांची संख्या आधीच चिंताजनक आहे. हा निर्णय मराठी शाळांसाठी घातक असून मराठी शाळा संपवण्याचा हा एक नियोजित डाव आहे. सरकारच्या या निर्णयामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षाविषयी प्रचंड संभ्रम निर्माण झाला आहे. हा महाराष्ट्राच्या शैक्षणिक स्वायत्ततेवर आणि संस्कृतीवर थेट आघात आहे. आपली संस्कृती आणि वारसा पुढील पिढींपर्यंत पोहोचावा, यासाठी सरकार कोणती पावले उचलत आहे? याचाही खुलासा होणे गरजेचे आहे असे मतही यावेळी व्यक्त केले.

cmyk

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. २३ मार्च २०२५



## योगेश्वरी वधु -वर सूचक मंडळाच्या परिचय अंकाचे लवकरच प्रकाशन, समाजभूषण पुरस्कार वितरण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी ब्राह्मण वधू-वर सुचक मंडळाच्या अंकाचे मान्यवरांच्या उपस्थितीत लवकरच प्रकाशन तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार वितरण होणार असल्याची माहिती अध्यक्ष प्रभाकर सेलमोकर यांनी दिली.

गेल्या अनेक वर्षापासुन मराठवाड्यात व त्या बाहेर योगेश्वरी वधु वर मंडळाचे कार्य झेपावले आहे वधु-वरांच्या माहितीची परिचय अंक देखील सातत्याने प्रकाशित होत असतो या मंडळातील सर्व पदाधिकारी,संचालक हे निस्वार्थ भावनेने सेवा बजावतात आणि मुख्य म्हणजे या परिचय पुस्तिकेव्दारे विवाह हमखास जुळून येतात हा सर्वांचाच अनुभव आहे मंडळाच्या पदाधिकारी व संचालक यांनी वधुवर परिचय अंक प्रकाशित करण्याचे ठरविले त्या प्रमाणे लवकरच हा अंक प्रकाशित होणार आहे शिवाय विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविले जाणार आहे यासाठी योगेश्वरी वधु-वर सूचक मंडळाचे पदाधिकारी बाबुराव बाभुळगावकर,श्रीपाद चिक्षे,संचालक अशोकराव टाकळकर, श्रीराम हिवरेकर,मुकुंद घाटे,राहूल देशपांडे, राजश्री पिंपळे,कल्याणी सोनेसांगवीकर,स्मिता भातलवंडे आदी परिश्रम घेत आहेत.

# महावितरणला सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनीचा पुरस्कार

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

**महावितरणला शुक्रवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळातर्फे (सीबीआयपी) सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारी वीज वितरण कंपनी म्हणून गौरविण्यात आले. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी महावितरणचे कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर उपस्थित होते.**

महावितरणच्या गौरवाबद्दल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे आभार मानले तसेच महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

महावितरण मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्याला वीज पुरवठा करते. महावितरणचे घरगुती, औद्योगिक, व्यावसायिक आणि कृषी असे ३ कोटी ११ लाख ग्राहक आहेत. महावितरण देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी आहे. महावितरणने ग्राहक सेवेसाठी तसेच वीज वितरणासाठी माहिती तंत्रज्ञानाचा केलेला वापर, ऊर्जा परिवर्तन आराखडा राबवून नवीकरणीय ऊर्जेच्या वापरावर दिलेला भर, वीज खरेदी खर्चात कपात करून ग्राहकांसाठीचा वीजदर कमी करण्यासाठी आयोगासमोर मांडलेला प्रस्ताव, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर ऊर्जा मिळण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० सह राबविलेल्या विविध योजना आदी बाबींचा विचार करून महावितरणला सर्वोत्कृष्ट कामगिरीच्या पुरस्कारासाठी निवडण्यात आले. वीज उपकेंद्रांची संख्या वाढविणे, त्यांची क्षमता वाढविणे, नव्या वीज वाहिन्यांचे जाळे उभारणे, वितरण रोहित्रांची उभारणी तसेच वीज वितरण व्यवस्थेत केलेली सुधारणा यांचाही विचार महावितरणचा सन्मान करताना करण्यात आला. कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणारी मुख्यमंत्री सौर



केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळातर्फे गौरव

कृषी वाहिनी योजना २.० ही गेम चेंजर योजना आहे. हा देशातील सर्वात मोठा विकेंद्रीत सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अनेक दशकांची कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठ्याची मागणी पूर्ण होणार आहे. योजनेची अंमलबजावणी वेगाने सुरू आहे.आगामी वर्षामध्ये राज्यातील सर्व कृषी पंपांना शंभर टक्के सौर ऊर्जेचा पुरवठा करण्याचे उद्दीष्ट पूर्ण होईल. या योजनेत किफायतशीर दरात वीज उपलब्ध होत आहे. त्यामुळे महावितरणचा वीज खरेदी खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेच्या माध्यमातून सौर कृषी पंप बसविण्यात महावितरणने देशात प्रथम स्थान मिळविले आहे. उपसा सिंचन योजना सौर ऊर्जेवर चालविण्यासाठीच्या राज्य सरकारच्या योजनेसाठी महावितरणला नोडल एजन्सी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.गावाची संपूर्ण विजेची गरज स्थानिक पातळीवर तयार झालेल्या सौर ऊर्जेवर भागवून गावाला ऊर्जा स्वयंपूर्ण करण्यासाठी महावितरणने सौर ग्राम योजना सुरू केली आहे. त्यामुळे गावकरी वीजबिलमुक्तही होतात. राज्यात १०० गावे महावितरणतर्फे सौर ग्राम विकसित करण्यात येणार असून त्यापैकी १० गावे सौर ग्राम झाली आहेत. महावितरणने स्वतःची कार्यालये, वीज उपकेंद्रे, ग्राहक सेवा केंद्रे आणि अतिथी गृहे सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी मोहीम सुरू केली आहे. महावितरणच्या मुख्यालयाच्या छतावर बसविलेल्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाचे नुकतेच उद्घाटन झाले.महावितरणने राज्यात विद्युत वाहनांसाठी ६३ चार्जिंग स्टेशन्स राज्यात उभारली आहेत. पुणे येथे उभारलेल्या विद्युत वाहनांचे चार्जिंग स्टेशन छतावरील सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाला जोडून महावितरणने अक्षय्य ऊर्जेच्या आधारे वाहनांचे चार्जिंग करण्यासाठी पाऊल टाकले आहे.

## जिल्हा प्रशासनाकडून ३५०० जन्म प्रमाणपत्र रद्द खा .किरीट सोमय्या यांची जालन्यात माहिती

**जालना । प्रतिनिधी**


**राज्यामध्ये विविध तहसील कार्यालयामार्फत जन्म नोंदीचे प्रमाणपत्र देण्यात आले होते परंतु याची चौकशी केली असता खोटे बनावट असल्याचे निदर्शनात आल्यामुळे आता जन्म नोंदीचे प्रमाणपत्र रद्द करण्याचे काम सुरू आहे. जालना जिल्हयात देण्यात आलेल्या एकुण ८ हजार ५५१ जन्म प्रमाणपत्रापैकी ३ हजार ५९५ जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली असल्याची माहीती जिल्हा प्रशासन अधिकारी च्या वतीने जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली असल्याचा दावा माजी खा. किरीट सोमय्या यांनी जालना येथे आले असता यावेळी त्यांच्याकडून सांगण्यात आले.**

यावेळी श्री किरीट सोमय्या यांनी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांची भेट घेऊन चर्चा केली होती. त्यानंतर माध्यमांसमोर बोलतांना त्यांनी वरील प्रमाणे दावा केला असून पुढे बोलतांना ते म्हणाले, महाराष्ट्रात बांग्लादेशी घुसखोरांचे एक मोठे रॅकेट सक्रीय असून त्यांच्या माध्यमातून बनावट कागदपत्रांच्या आधारे जन्म प्रमाणपत्र देण्याचे काम गेली काही दिवसांपासून सुरू आहे. मागील दोन महीन्यापुर्वी सोमय्या यांनी या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी केली होती. त्यानंतर श्री. सोमय्या यांनी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांची भेट घेवून याच विषयावर चर्चा केली. अंबड, भोकरदन, जालना आणि परतूर तालुक्यातील बंगालीदेशींचे जन्म प्रमाणपत्रासाठी अर्ज आलेले असून ते अर्ज रद्द केल्यानंतर शिल्लक राहीलेल्या अर्जापैकी ७० टक्के अर्ज होतील असा दावा सोमय्या यांनी केला असून जन्म प्रमाणपत्रासाठी देण्यात आलेल्या एक हजार अर्जात फसवे शपथपत्र देण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे जन्म प्रमाणपत्र घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर महाराष्ट्रात आतापर्यंत २४ ठिकाणी गुन्हे दाखल झाले असून अकोल्यामध्ये ५३ लोकांना अटक झाली आहे. तर मालेगावातील ३८ जण फरार आहेत. जालना जिल्ह्यात देखील असे गुन्हे दाखल होतील असेही सोमय्या यांनी सांगितले. जन्म प्रमाणपत्रासाठी पुर्वी न्यायालयात जावे लागत होते त्यामुळे राज्य सरकारने मागील वर्षी जन्म प्रमाणपत्र देण्याचे अधिकार तहसीलदारांना दिले आहेत. परंतु जालना जिल्ह्यात नायब तहसीलदारांनी अशा प्रमाणपत्रांचे वाटप केले असल्याची माहीतीही सोमय्या यांनी दिली आहे. आता रद्द करण्याचा अधिकार तहसीलदार यांना देण्यात आलेली आहे.

## गेवराई बसस्थानकातील शौचालयाची स्वच्छता आदर्श घेण्यासारखी

बीड । प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळ मार्फत करा व वापरा या स्वच्छ्याचे गेवराई बस स्थानकामधील स्वच्छालय हे बीड जिल्ह्यातील नंबर एक शौचालय स्वच्छतेच्या बाबतीत व सौंदर्याच्या बाबीत आहे संभाजीनगर सोलापूर नॅशनल हायवे २११ वर गेवराई बस स्थानक असून या बस स्थानकात रोज हजारो प्रवासी एसटी बसने प्रवास करतात या शौचालयाच्या आत गेल्यानंतर स्वच्छता व काही सुविचार भिंतीवर असून ते एसटीचा प्रवास सुखाचा प्रवास, वाट पाहिल पण एसटीने जाईल, सुखाचा प्रवास कसा एसटीचा प्रवास जसा, उशीर लागेल पण एसटीने जाईल, जनसेवा हीच ईश्वर सेवा, यांना अनेक सुविचारांनी भिंती रंगवण्यात आल्या असून या शौचालयाचे कौतुक करावे तेवढे कमी आहे या शौचालयाचे राजश्री शाहू महाराज




मागासवर्गीय सेवाभावी संस्था चे संस्थापक अध्यक्ष ईश्वर भाऊ सुतार या स्वच्छालयाचा बीड जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रातील स्वच्छालय चालकांनी याचा ध्यास घ्यावा..

पान ६ वरून...

### आष्टीत महेबुब शेख

सदरील रोजा इफ्तार पार्टीमध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य सतिश शिंदे,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे तालुकाध्यक्ष परमेश्वर शेळके, आण्णासाहेब चौधरी,राम खाडे डॉ. शिवाजी राऊत, सुनिल नाथ,संजय थोरवे, डॉ नदीम शेख, ॲड रिजवान शेख, जिशान सय्यद,दादासाहेब झांजे,जगन्नाथ ढोबळे, डॉ विलास सोनवणे, डॉ राज शेख, विजय गाढवे, शफ्फी सय्यद,शेरूभाई शेख,माऊली मुटकुळे,सादीक कुरेशी,गणीभाई तांबोळी, अतुल शिंदे, शब्बीर शेख,मोसिम पठाण, सचिन गोंदकर, अशोक पोकळे, शिवाजी सुरवसे, ॲड बी सी शेख,लईकशेठ काझी, मोहसिन कुरेशी,लहू भवर,शाहुल काकडे,तोफीक शेख,रजी बेग, वसिम बारी,अन्वर अत्तार, मोहम्मद कुरेशी ,निसार कुरेशी,गुलाम हाबीज साहेब,असद सय्यद,कलील शेख,जाकीर अत्तार, ॲड वहिम शेख, हमीद बेग,तसेच कार्यकर्ते, डॉक्टर,वकील, पत्रकार, सर्व क्षेत्रातील मान्यवर व हिंदू,मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### युवासेना व वाकणकर

आणी सिनर्जी अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे व युवा खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातुन मोफत असणार आहे आणी मोफत नोंदणीसाठी लिंक: ://./४ वर जाऊन विद्यार्थ्यांने या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये सहभागी व्हायचे आहे अशी माहिती युवा सेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपूर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे, युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे

यांनी दिली असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी

यांनी या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये सहभाग नोंदवावा व आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी एक पाऊल पुढे टाकावे असे आवाहन युवासेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपुर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व बीड लोकसभा निरीक्षक सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे,युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजित शिंदे यांनी केले आहे.

### अनेक योजना शेतकऱ्यांसाठी

पत्रकार शरद गर्जे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख व पंचक्रोशीतील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला कार्यक्रम प्रसंगी सुरडी येथील माजी सरपंच अशोक गर्जे तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांचे समयोजित भाषणे झाली.सूत्रसंचालन विजय मरकड यांनी केले तर उपस्थितांचे आभार नवनाथ भगत यांनी मानले.

### मच्छिंद्रगडाचा ४७ वा नारळी

व्यवस्था करण्यात येणार आहे. या व्यवस्थेवर स्थानिक पातळीवरील संयोजक बारकाईने लक्ष ठेवणार आहेत. यासाठी विशेष स्वयंसेवक समितीही गठित करण्यात आली आहे.


या सप्ताहाच्या तयारीत स्थानिक ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने सहभागी झाले असून प्रत्येक जण आपापल्या परीने योगदान देत आहे. महंत जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर यांच्या नेतृत्वाखाली हा सप्ताह भक्तिमय आणि यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त होत आहे.

मच्छिंद्रगडाचा नारळी सप्ताह हा केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक एकतेचे प्रतीक मानला जातो. दरवर्षी हजारो भाविक या सप्ताहात सहभागी होण्यासाठी दूरदूरवरून येतात. या सोहळ्यामुळे गावाचे वातावरण भक्तिमय होऊन सामाजिक ऐक्याचे दर्शन घडते.

मच्छिंद्रगडाचे संस्थापक आध्यक्ष ब्रम्हलीन संत निगमानंद महाराज यांच्या जन्मभुमी आसलेल्या नांदेवाली येथे मच्छिंद्रगडाचा फिरता नारळी सप्ताह होत आहे .त्या साठी ग्रामस्थांकडून तयारीला ऊस्पुर्त प्रतिसाद मिळत असून सप्ताह भव्यदिव्य स्वरूपात होणार आहे.

स्वामी जनार्दन महाराज मठाधिपती मच्छिंद्रगड ता.शिरूर कासार

## आज स्वरेशा पोरे यांचे गायन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील संगीत साधना मंचच्या वतीने शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठीच्या मासिक सभेत आज रविवार २३ मार्च रोजी होणाऱ्या सभेत पुणे येथील प्रख्यात गायिका स्वरेशा पोरे(कुलकर्णी) यांचे स्वतंत्र गायन होणार आहे संवादिनीवर विश्वजित धाट हे तर रत्नदिप शिगे तबल्यावर साथसंगत करतील खोलेश्वर महाविद्यालयाच्या स्व. गोपीनाथ मुंडे सभागृहान सकाळी साडे दहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## खोलेश्वर महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण या विषयावर व्याख्यान

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दि . २० /०३/ २०२५रोजी खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई येथे सामाजिक शास्त्रेअभ्यास मंडळ आयोजित नवीन शैक्षणिक धोरणानुसार विषयाची निवड अभ्यासक्रमाची ओळख व मूल्यमापन प्रक्रिया या विषयावर व्याख्यानाची आयोजन करण्यात आले होते .या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली .या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सामाजिक शास्त्रे मंडळाचे प्रमुख डॉ . तात्या पुरी यांनी केले त्यांनी प्रास्ताविकात बोलताना म्हणाले की सामाजिक शास्त्रे या विषयाच्या अनुषंगाने त्यांनी सामाजिक उपक्रम भित्तीपत्रक आयोजन करणे समाजातील लोकांच्या गरजा नवीन ज्ञान निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमाची आवश्यकता असते . या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सामाजिक जाणीव जागृती व्हावी या दृष्टिकोनातून सामाजिक शास्त्रे मंडळ महाविद्यालयामध्ये निर्माण केले जाते . असे मत त्यांनी आपल्या प्रस्ताविकात व्यक्त केले .या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून



स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई चे इंग्रजी विभागाचे विभाग प्रमुख डॉ धनाजी आर्या हे बोलत होते . त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात असलेल्या गोष्टींचे महत्त्व त्यांनी सांगितले एन इ पी ची रचना कशी केली . तसेच स्किलच्या आधारावर एनईपी ची निर्मिती कशी आहे याचे महत्त्व त्यांनी सांगितले त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले स्किल विकसित केले पाहिजे नवीन शैक्षणिक धोरणात चॉईस बेसड क्रेडिट सिस्टीम तसेच मेजर आणि मायनर स्किल बेस्ड लर्निंग ती कशी असते याची सविस्तर माहिती त्यांनी दिली .तसेच त्यांनी इंडियन नॉलेज सिस्टीम कसे असावे याविषयी आपले मत मांडले .तसेच एनईपीच्या नियंत्रणा खाली शैक्षणिक पद्धती कशा स्वरूपाच्या आहेत .सेमिस्टर पद्धती परीक्षा मार्कांची विभागणी कशी केली आहे . याची सविस्तर माहिती त्यांनी यावेळी सांगितली .या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती व कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .दीपक फुलारी हे व्यासपीठावर उपस्थित होते .अध्यक्ष समारोप प्रसंगी डॉ . दीपक फुलारी यांनी मार्गदर्शन केले नवीन शैक्षणिक धोरणात प्रत्येकाने आपल्या स्किल मध्ये वाढ करणे आवश्यक आहे . नवीन शैक्षणिक धोरणात दिले जाणारे शिक्षण हे स्किल आधारित असल्यामुळे ते स्किल प्रत्येकाकडे अवगत असणे आवश्यक आहे येणाऱ्या स्पर्धेच्या युगात स्वतः उतरवून स्वतःमध्ये काही बदल घडविणे काही ज्ञान अवगत करणे महत्वाचे वाटते शेवटी बोलताना म्हणाले की जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी स्वतः मध्ये स्किल वाढविण्याचा प्रयत्न करावा तसेच सकारात्मक विचार करावा असे मत त्यांनी व्यक्त केले .या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सामाजिक शास्त्र मंडळाचे प्रमुख डॉ . तात्या पुरी यांनी केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागाचे विभाग प्रमुख प्रा .किशोर काळुसे सर यांनी केले तर आभार डॉ . विलास नरवडे यांनी मानले .या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी उपस्थित होते.

# स्काऊट गाईड ही चारित्र्यसंवर्धनाची चळवळ- जगदीश मिनीयार

## चांगल्या विचारांचे बीजारोपण करणारा स्काऊट गाईड उपक्रम -आ. खोतकर

**जालना । प्रतिनिधी**

आजच्या तंत्रज्ञान युगात मुलांवर सुयोग्य संस्कारासाठी स्काऊट गाईड सारखी चळवळ प्रभावी ठरते. शाळांमधून शिक्षकांनी अशा उपक्रमाना जाणिवेतून राबविण्यासाठी प्रयत्न करावे.चांगल्या मूल्यसंस्काराचे बीजारोपण करणारी स्काऊट गाईड चळवळ कार्य प्रेरणादायी आहे,असे प्रतिपादन आमदार अर्जुन खोतकर यांनी उदघाटन समारंभात बोलताना केले.

शहरातील जिल्हा परिषद मुलांची प्रशालेत जालना भारत स्काऊट आणि गाईड जिल्हा कार्यालय जालना व शिक्षण विभाग प्राथमिक माध्यमिक जिल्हा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्काऊट गाईड जिल्हा मेळाव्याच्या उदघाटन समारंभाचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार हे होते. आमदार अर्जुन खोतकर यांच्या शुभहस्ते शनिवारी २२ उदघाटन करण्यात आले.कार्यक्रमास आमदार अर्जुन खोतकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक तथा जिल्हा मुख्य आयुक्त कैलास दातखीळ,शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहराध्यक्ष विष्णु पाचफुले,माजी सभापती संतोष मोहिते, जिल्हा संघटक के.एल.पवार, सोनिया शिरसाट, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त व्ही.बी.गायकवाड, गाईड आयुक्त अख्तरजहा कुरैशी, गटशिक्षणाधिकारी डॉ.भरत वानखेडे, गटशिक्षणाधिकारी दत्ता क्षीरसागर, गटशिक्षणाधिकारी



रवींद्र जोशी,गटशिक्षणाधिकारी सतीश शिंदे,मुख्याध्यापक प्रकाश कुंडलकर,विजय उबरहंडे, अरुण जाधव,

मुख्याध्यापिका अनिता पवार यांची उपस्थिती होती. उदघाटन कार्यक्रमात बोलताना आमदार अर्जुन खोतकर म्हणाले,की जीवनात शिस्त आणायची असेल तर स्काऊट गाईड सारखा उपक्रम ही लोकचळवळ पुढे नेण्यासाठी जोमाने प्रयत्न व्हावेत,असेही आमदार खोतकर यांनी सांगितले. चांगल्या विचारांचे बीजारोपण मुलांमध्ये योग्यवेळीच झाले तर यशाचा मार्ग सापडतो,असे सांगून आमदार खोतकर यांनी स्काऊट गाईड उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार यांनी सांगितले, की स्काऊट गाईड ही विश्वव्यापी चारित्र्यसंवर्धनाची चळवळ असून या चळवळीच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांवर बाल वयात शिस्त स्वावलंबन सहकार्य भावना देशभक्ती सामाजिक सेवा इत्यादीचे कृतीयुक्त शिक्षण दिल्या जाते. त्यामुळे ही चळवळ शालेय विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी ठरते,यासाठी शाळा आणि शिक्षकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे,असेही सीईओ मिनीयार यांनी सांगितले. कार्यक्रमात प्रास्ताविक करताना जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ यांनी स्काऊट गाईड उपक्रमाची विविध ध्येये ठेवून कशाप्रकारे जिल्ह्यातील शाळांमधून चळवळ राबविली जाते हे विशद केले. उदघाटन समारंभाचे सूत्रसंचालन माजी सचिव पवन जोशी यांनी केले. यावेळी मेळाव्यात जिल्ह्यातील विविध शाळांमधून ७६६ स्काऊटर- गाईडर सहभाग झाला होता. जिल्हा मेळाव्यात सहभागी स्काऊट गाईड स्वयंसेवक विविध वेशभूषा करीत रविवारी दिनांक २४ रोजी जालना शहरातून भव्य शोभायात्रा निघणार असून दुपारी मेळावा समारोप तथा बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न होणार आहे. मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट व्ही बी गायकवाड, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड श्रीमती अत्तर जहाँ कुरैशी, जिल्हा संघटक स्काऊट के एल पवार, जिल्हा संघटक गाईड सोनिया शिरसाट, माजी सचिव पवन जोशी, डॉ.सुहास सदाव्रते, ज्येष्ठ स्काऊट मास्टर एस बी गाडगे, एस. एल. खरात, निलेश श्रीसुंदर, रमेश भागवत,संदीप इंगोले, विजय निकाळजे, व्ही.ए.आरसूड, रघुनंदन कंगले,शिवाजी पटेकर यांनी प्रयत्न केले.

cmyk

# प्रति थेंब अधिक पीक योजनेतून सूक्ष्म सिंचनासाठी १५२ कोटींचा निधी

## शासनाने काढला आदेश, शेतकऱ्यांना दिलासा

मुंबई : राज्य सरकार राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक योजनेतील सर्वसाधारण प्रवर्गाचा १५२ कोटी १४ कोटी रुपयांचा निधी कृषी आयुक्तांकडे वितरणासाठी मंजूर केला. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना २०२४-२५ मधील ठिबक आणि तुषार सिंचनाचा निधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने या संदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी प्रसिद्ध केला आहे.



प्रति थेंब अधिक पीक या योजनेतून सूक्ष्म सिंचन घटकातून शेतकऱ्यांना ठिबक आणि तुषार सिंचनासाठी लाभ दिला जातो. त्यासाठी केंद्र सरकार ६० टक्के आणि राज्य सरकार ४० टक्के निधीचा हिस्सा देते. त्यानुसार १६ मे २०२४ च्या शासन निर्णयानुसार सूक्ष्म सिंचन घटकासाठी ६६७ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या योजनेसाठी केंद्र सरकारचा ४०७ कोटी रुपयांचा हिस्सा होता. तर राज्य सरकारचा २७१ कोटी ३३ लाख रुपयांचा हिस्सा होता. यामधील १५२ कोटी १४ लाख रुपयांचा निधी सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थी शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी राज्य सकरने मान्यता दिली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यातील शेतकऱ्यांचं सूक्ष्म सिंचन अनुदान मागील वर्षभरापासून प्रलंबित आहे. परंतु शेतकऱ्यांनी सिंचन संच खरेदी करूनही लाभ वेळेवर न मिळाल्याने कोंडी झालेली आहे. तसेच मागील दोन वर्षांचे अनुदान विविध जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्राप्त झाले नसल्याचे शेतकरी सांगतात. त्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलन आणि मोर्चा काढून सरकारच्या या प्रश्नाकडे लक्ष वेधले. दरम्यान, केंद्र सरकार विविध योजनांचा निधी राज्य सरकारला वेळेवर देत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचं सिंचन अनुदान प्रलंबित असल्याची कबुली अलीकडेच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली होती. त्यावरून शेतकऱ्यांमध्ये नाराजी उमटली होती. त्यानंतर राज्य सरकारने आता योजनेतील निधी वितरित करण्यास मान्यता दिली आहे. कृषि आयुक्तांकडून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर लाभ डीबीटीमार्फत जमा करण्यात येणार आहे.

## आंबा बाग पाणी व्यवस्थापन



आंबा उत्पादनात गुणवत्ता आणि फळधारणा सुधारण्यासाठी योग्य पाणी व्यवस्थापन गरजेचे आहे. आंबा झाडांसाठी पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे केल्यास फळांची गळ कमी होते आणि उत्पादनात वाढ होते.

फळधारणा झालेल्या आंबा बागेतील पाणी व्यवस्थापन : जेव्हा आंबा झाडे फळधारणेच्या अवस्थेत पोहोचतात, विशेषतः वाटाणा ते सुपारी आकाराच्या फळांपर्यंत, तेव्हा झाडांना नियमित आणि नियंत्रित प्रमाणात पाणी देणे आवश्यक असते. पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रति झाड या प्रमाणात द्यावे. १५ दिवसांच्या अंतराने ३-४ वेळा पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन (मल्चिंग) केल्यास मुळांभोवती ओलावा टिकून राहतो आणि पाण्याचा योग्य वापर होतो.

नवीन लागवड केलेल्या झाडांसाठी पाणी व्यवस्थापन : नवीन लागवड केलेल्या झाडांसाठी योग्य प्रमाणात पाणी दिल्यास ती चांगली वाढतात आणि उत्पादनक्षम होतात. हिवाळा आणि उन्हाळा यानुसार पाणी देण्याचे प्रमाण वेगवेगळे असते.

हिवाळ्यात पाणी व्यवस्थापन : पहिल्या वर्षी आठवड्यातून एकदा ३० लिटर (२ बादल्या) पाणी प्रति झाड द्यावे. दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसांतून एकदा ३० लिटर पाणी द्यावे.

तिसऱ्या वर्षी महिन्यातून एकदा ३० लिटर पाणी पुरेसे असते.

उन्हाळ्यात पाणी व्यवस्थापन : उन्हाळ्यात पाण्याची गरज वाढते, त्यामुळे वरील प्रमाणात दुप्पट (६० लिटर) पाणी प्रति झाड द्यावे.

जागेवर रोपे तयार करणे आणि पाणी बचत : आंबा रोपवाटिकेत किंवा जागेवरच झाडांची रोपे वाढवून त्यावर कलमे केल्यास त्यांना विशेष पाणी द्यावे लागत नाही. अशा रोपांमध्ये मुळांची नैसर्गिक वाढ होते, त्यामुळे कमी पाण्यातही ती तग धरतात. गवताचे आच्छादन (मल्चिंग) केल्यास मातीतील ओलावा टिकून राहतो, परिणामी पाणी देण्याची गरज कमी होते.

अधिक उत्पादनासाठी : आंबा झाडांची वाढ आणि उत्पादन हे मोठ्या प्रमाणात पाणी व्यवस्थापनावर अवलंबून असते. नियंत्रित प्रमाणात आणि योग्य वेळेत पाणी दिल्यास झाडांची गळ कमी होते आणि फळधारणा वाढते. तसेच, मल्चिंगसारख्या तंत्रांचा वापर केल्यास पाण्याची बचत होते आणि झाडांचे आरोग्य सुधारते.

जर तुम्हाला तुमच्या आंबा बागेच्या उत्पादनात वाढ करायची असेल तर वरील पाणी व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करा आणि अधिक उत्पादन घ्या.

## धान्यातील कीड रोखण्यासाठी हे उपाय करा

धान्य साठवणुकीवेळी किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी विविध कीटकनाशकांचा वापर केला जातो. त्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे घरातच उपलब्ध असणाऱ्या पदार्थांचा वापर करुन धान्याचे साठवणूकीतील नुकसान टाळता येते.



कडुलिंब : अगदी सहज उपलब्ध असणारी कडुलिंबाची पाने वापरुन धान्यातील कीड, बुरशी टाळता येते. कडुलिंबाची पाने अनेक शेतकरी वापरतात. यासाठी कडुलिंबाची पाने सावलीमध्ये वाळवून घ्यावीत. वाळलेली पाने प्लॅस्टिक किंवा कापडाच्या पिशवीत भरावीत. या पिशवीला लहान छिद्रे पाडावीत किंवा कापडात बांधावीत. ही पिशवी धान्याच्या गोण्यांमध्ये वेगवेगळ्या थरांमध्ये किंवा साठवणुकीच्या डब्यामध्ये ठेवावीत. कडुनिंब पानांच्या तीव्र वासामुळे धान्याला कीड लागत नाही.

लसून : बुरशी, कीड रोखण्यासाठी वापरला जाणारा दुसरा पदार्थ म्हणजे लसूण. त्यासाठी साल न काढलेली लसणाची संपूर्ण गड्डी वापरावी. प्रथम डब्यात धान्य टाकून त्यावर लसणाची एक गड्डी आणि त्यावर पुन्हा धान्य असे साधारण थर ठेवावेत. तसेच डब्याचे झाकणही बंद राहील याची काळजी घ्यावी. धान्यातील कीड आणि अळ्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लाल मिरचीचा वापरही फायदेशीर ठरतो. त्यासाठी धान्य भरताना प्रत्येक थराला ४ ते ५ लाल सुकलेल्या मिरच्या ठेवाव्यात.

लवंग : लवंग वापरुनही धान्यातील कीड, बुरशीला रोखता येते. या पद्धतीमध्ये कडुलिंबाची वाळवलेली पाने आणि लसूण समप्रमाणात घेऊन त्यात १० ते १५ लवंगा टाकाव्यात. त्यानंतर मिक्सरच्या भांड्यात थोडे पाणी टाकून कडुनिंब पाने, लसूण आणि लवंग चांगले बारीक करून घ्यावे. तयार मिश्रणाच्या मध्यम आकाराच्या गोळ्या बनवून २ ते ३ दिवस उन्हामध्ये सुकवाव्यात. या गोळ्या कापडामध्ये बांधून धान्यांच्या थरांत ठेवाव्यात. त्यामुळे कीड आणि अळींचा प्रादुर्भाव कमी होतो.याशिवाय कडुलिंबाच्या बियांची पावडर ही धान्य साठवणुकीसाठी अत्यंत प्रभावीपणे काम असते. कडुलिंबाच्या बियांची पावडर धान्यात मिसळल्यास किडीपासून संरक्षण होते. पुदिना पानांची भुकटी किंवा राख धान्यात मिसळल्यास किडींच्या श्वसनामध्ये अडथळा येऊन कीड मरते. बऱ्याच वेळा साठवलेल्या धान्यामध्ये भुंगेऱ्यांचा प्रादुर्भाव दिसून येतो. नियंत्रणासाठी साठवणुकीवेळी धान्यात मीठ मिसळावे किंवा कांदे ठेवावेत. कांद्याच्या उग्र वासामुळे धान्याला भुंगेरे लागत नाहीत. तसेच मीठ धान्यातील अतिरिक्त पाणी शोषून घेते. त्यामुळे जिवाणूंची वाढ होत नाही. याशिवाय काही तेलांचा वापर करुनही धान्यातील कीडीला अटका घालता येतो. यामध्ये धान्य साठवणुकीवेळी एरंडी, भुईमूग, खोबरेल किंवा मोहरी तेल वापरल्यास किडींचा प्रादुर्भाव रोखता येतो. तेलामुळे किडींची अंडी उबण्यास प्रतिबंध होऊन उत्पत्ती थांबते. त्यासाठी १ चमचा तेल प्रति किलो धान्य याप्रमाणे चोळावे. १ क्विंटल धान्यासाठी अर्धा ते एक किलो तेल वापरावे. अशा प्रकारे घरात सहजपने उपल्ध असणारे पार्थ वापरुन धान्यातील कीड, बुरशी रोखता येते.

# काशीफळाची लागवड आणि व्यवस्थापन

पूर्वी परसबागेत किंवा शेतात कुठेतरी बांधावर, कोपऱ्यातील मोकळ्या जागेत काशीफळाच्या एक दोन वेलीची लागवड केली जाई. बहुतांश वेळी आपोआप बिया पडून उगवून येणारे हे दुर्लक्षित वेलवर्गीय वनस्पती आहे. पण गेल्या काही वर्षापासून उपयुक्त खाद्य म्हणून विशेष करून शेतामध्ये लागवड होऊ लागली आहे.



जाती : काशीफळाच्या जवळपास ३० प्रजातींपैकी कुकुरबिटा पेपो, कुकुरबिटा मोशाटा, कुकुरबिटा मॅक्सिमा, कुकुरबिटा अग्रीरोस्पर्मा, कुकुरबिटा फिसिफोलिया या जातींची लागवड केली जाते. रंगाने आणि आकाराने वेगवेगळ्या प्रजाती काशीफळ पिकात उपलब्ध आहेत. याशिवाय सुधारित वाण दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेने पुसा विश्वास या जातीची शिफारस केली आहे. पुसा विकास, पुसा हायब्रीड १, अर्का सूर्यमुखी, अर्का चंदन, काशी हरित, काशी शिशिर एफ, आनंद पंपकीन १, को १, को २ या जातीही उपलब्ध आहेत. याशिवाय १ किलोपासून ३०-३५ किलो वजनापर्यंत वाढणारे काळा, मोठा गर्द हिरवा, मोठा गोल, चपटा हिरवा, पिवळा, लाल अशा विविध प्रकारांच्या काशीफळाचे संकरित वाण उपलब्ध आहेत.

हवामान :सुरुवातीच्या काळात चांगल्या वाढीसाठी किमान १८ अंश सेल्सिअस तापमान गरजेचे आहे. या पिकास उष्ण हवामान चांगले मानवते. वाढलेली थंडी या पिकाला उपयुक्त ठरते. सरासरी तापमान २५-३५ अंश सेल्सिअस लागवडीसाठी उपयुक्त आहे. कमाल तापमान ४० अंशापर्यंत, तर किमान १८ अंशांपर्यंत असावे. जास्त तापमानात नर फुलांची संख्या वाढून मादी फुलांची संख्या कमी होते. त्यामुळे उत्पादनामध्ये घट येते.

लागवडीसाठी हंगाम : उन्हाळी हंगामात जानेवारी ते मार्च दरम्यान लागवड केली जाते. तर खरीप हंगामात जून-जुलैमध्ये २ ते ३ चांगला पाऊस झाल्यानंतर लागवड करावी.उन्हाळी हंगामाच्या तुलनेत खरीप हंगामात अधिक उत्पादन मिळते. रब्बी हंगामामध्ये तुलनेने उत्पादन कमी येते. अशी लागवड फायदेशीर ठरत नाही. हरितगृहामध्ये नियंत्रित वातावरणामध्ये रब्बीतही लागवड करणे शक्य आहे.

लागवडीचे अंतर : जमिनीचा पोत बघून दोन ओळींतील अंतर ६ किंवा ८ फूट आणि दोन वेलींतील अंतर ३ किंवा २ फूट ठेवावे. बियाणे २ ते २.५ सेंमी पेक्षा जास्त खोल टोकू नये. हलकी ते मध्यम स्वरूपाची पोयटा माती, सेंद्रिय पदार्थ युक्त व निचऱ्याची जमीन चांगल्या वाढीस उपयुक्त आहे. जमिनीचा सामू ६-७ पर्यंत असावा.

काढणी : हे पीक १०० ते १२० दिवसात तयार होते. दोन अवस्थांमध्ये काशीफळांची काढणी केली जाते. अपरिपक्व फळ हे भाजीसाठी वापरतात. पूर्ण परिपक्व झालेले फळ हे गोड पदार्थ व जास्त दिवस साठवून ठेवण्यासाठी वापरले जाते. साधारणपणे ९० दिवसांपासून विविध वाणांची फळे काढणीस येतात. पिकाची काढणी जातिपरत्वे पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर करावी. काढणी करताना फळाला १ इंच देठ ठेऊन तोडणी करावी.

उत्पादन : २० ते ४५ टन प्रति हेक्टर. वेगवेगळ्या प्रकारच्या फळानुसार दर मिळतो. एका वेलीवर दोन फळ अशाप्रकारे नियोजन केल्यास फळांचे वजन चांगले मिळते. जितके जास्त वजन तितकी अधिक मागणी बाजारपेठेमध्ये असते. स्थानिक बाजारांसोबत अन्य राज्यातील व्यापाऱ्याकडूनही मोठ्या प्रमाणात व वर्षभर मागणी असते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### शहीद स्मृती दिन

### महत्वाच्या घटना

१८३९ : बोस्टन मॉर्निंग पोस्ट या वृत्तपत्रात ओ. के. या शब्दाचा पहिला छापील उपयोग झाला.
१८५७ : न्यूयॉर्क शहरात पहिली लिफ्ट सुरू करण्यात आली.
१८६८ : कॅलिफोर्निया विद्यापीठाची ओकलंड येथे स्थापना झाली.
१९१९ : बेनिटो मुसोलिनी यांनी मिलान इटली मध्ये हुकूमशाही राजकीय चळवळ सुरूकेली.
१९३१ : सॉन्डर्सचा वध करणार्या भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांना लाहोरच्या तुरूंगात फाशी देण्यात आले.
१९४० : संपूर्ण स्वतंत्र पाकिस्तानच्या निर्मितीचा ठराव लाहोर येथील मुस्लीम लीगच्या अधिवेशनात संमत
१९५६ : पाकिस्तान हे जगातील पहिले इस्लामी प्रजासत्ताक बनले.
१९६५ : अमेरिकेतील अंतराळ संस्था नासाने आपले पहिले अंतरीक्ष यान 'जैमिनी ३' च्या साह्याने दोन व्यक्तींना अंतराळात पाठविले होते.
१९८० : प्रकाश पदुकोण याने ऑल इंग्लंड बॅडमिंटन स्पर्धा जिंकली. ही स्पर्धा जिंकणारा तो पहिला भारतीय आहे.
१९८६ : भारतीय राखीव पोलीस दलातील महिलांच्या पहिल्या तुकडीला प्रशिक्षित करण्यात आले.
१९९८ : अभिनेते दिलीपकुमार यांना 'निशान-ए-इम्तियाज' हा पाकिस्तानचा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
१९९९ : क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर आणि अभिनेत्री सुलोचना यांना 'पद्मश्री' सन्मान प्रदान करण्यात आला.
१९९९ : पं. भीमसेन जोशी व लता मंगेशकर यांना 'पद्मविभूषण' सन्मानाने गौरविण्यात आले.
१९९९ : लता मंगेशकर व पंडीत भीमसेन जोशी 'पद्म भूषण' पुरस्कार व सचिन तेंडुलकर, सुलोचना यांना 'पद्मश्री' पुरस्कार मिळाला.
२००१ : रशियाचे मिर हे अंतराळ स्थानक पृथ्वीवर कोसळले.
२०१२ : भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर हे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० शतक पूर्ण करणारे पहिले खेळाडू बनले.
२०१४ : युरोपीय संघ आणि अमेरिकेने रुस राष्ट्रावर प्रतिबंध लावला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१४ : मुघल बादशाहा शहाजहा आणि मुमताज महल यांची सर्वात थोरली मुलगी जहाँआरा यांचा जन्मदिन.
१६९९ : अमेरिकन वनस्पतिशास्त्रज्ञ जॉन बार्ट्राम यांचा जन्म.
१७४९ : फ्रेंच गणितज्ञ पिएर सिमॉन दि लाप्लास यांचा जन्म.
१८८० : भारतीय क्रांतिकारक चित्तरंजन दास यांच्या पत्नी स्वातंत्र्यता क्रांतिकारी बसंती देवी यांचा जन्मदिन.
१८८१ : नोबेल पारितोषिक विजेते फ्रेंच लेखक रॉजर मार्टिन दु गार्ड यांचा जन्म.
१८८१ : नोबेल विजेते रसायनशास्त्रज्ञ हेर्मान स्टॉडिंगर यांचा जन्म.
१८८३ : मंजेश्वर गोविंद पै तथा राष्ट्रकवी गोविंद पै कन्नड कवी व श्रेष्ठ भाषा संशोधक, इतिहास व तत्त्वज्ञानाचे व्यासंगी, त्यांना कन्नड, कोंकणी, इंग्लिश, तुळू, संस्कृत, तेलुगू, तामिळ, मराठी, कन्नड, बंगाली, पर्शियन, पाली, ऊर्दू, ग्रीक, जपानी इ. २५ भाषा अस्खलित येत असत. त्यांनी अनेक जपानी ग्रंथांचे कन्नडमध्ये भाषांतर केले. (मृत्यू: ६ सप्टेंबर १९६३)
१८८९ : प्रख्यात भारतीय संस्कृत अभ्यासक, कवी, तत्ववेत्ता, व्याकरणकार, बहुपक्षी आणि राजस्थानमधील जयपूरच्या तंत्रज्ञांचे तज्ज्ञ, भट्ट मथुरानाथ शास्त्री यांचा जन्मदिन.
१८९३ : भारतीय व्यापारी गोपालस्वामी दुराईस्वामी नायडू यांचा जन्म. (मृत्यू: ४ जानेवारी १९७४)
१८९८ : नलिनीबाला देवी आसामी कवयित्री व लेखिका (मृत्यू: २४ डिसेंबर १९७७)
१९१० : डॉ. राम मनोहर लोहिया समाजवादी नेते, विख्यात संसदपटू, लोकसभेतील प्रभावी वक्ते व व्यासंगी लेखक. १९३२ मधे 'मिठाचा सत्याग्रह' या विषयावरील प्रबंधाकरता त्यांना बर्लिन विद्यापीठाने डॉक्टरेट पदवी दिली. इंग्रजीचे ते उत्तम जाणकार होते . मात्र त्यांना इंग्रजीची गुलामी मान्य नव्हती. इंग्रजी येत असुनही 'अंग्रेजी हटाओ' ही चळवळ त्यांनी चालविली होती. (मृत्यू: १२ आक्टोबर १९६७)
१९१२ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ आणि अभियंते वर्नर फॉन ब्रॉन यांचा जन्म.
१९१६ : हरकिशन सिंग सुरजित मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते व पॉलिट ब्यूरोचे सदस्य (मृत्यू: १ ऑगस्ट २००८)
१९१९ : भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्त्या, राजकारणी तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या खासदार सुभद्रा जोशी यांचा जन्मदिन
१९२३ : हेमू कलाणी क्रांतिकारक (मृत्यू: २१ जानेवारी १९४३)
१९३१ : व्हिक्टर कॉर्चनॉय रशियन बुद्धीबळपटू
१९५३ : किरण मुजूमदार शॉ भारतीय महिला उद्योजक
१९५४ : अमेरिकन फॅशन डिझायनर केनेथ कोल प्रॉडक्शन चे स्थापक केनेथ कोल यांचा जन्म.
१९६८ : माईक अ‍ॅथरटन इंग्लिश क्रिकेटपटू
१९७६ : भारतीय अभिनेत्री, निर्माता आणि राजकारणी स्मृती इराणी यांचा जन्म.
१९८७ : अभिनेत्री कंगना रणावत यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३१ : सरदार भगतसिंग, सुखदेव, शिवराम राजगुरु या तिघांना लाहोर तुरुंगामध्ये संध्याकाळी साडेसात वाजता फ़ाशी देण्यात आली. हे क्रांतीकारक देशासाठी हसतहसत फ़ासावर चढले. हुतात्म्यांचं पुण्यस्मरण.
१९३१ : भगत सिंग क्रांतिकारक (जन्म: २८ सप्टेंबर १९०७)
१९३१ : 'सुखदेव' थापर क्रांतिकारक (जन्म: १५ मे १९०७)
१९३१ : शिवराम हरी 'राजगुरू' (जन्म: २४ ऑगस्ट १९०८)
१९६५ : भारतीय स्वातंत्र्यता कार्यकर्ता सुहासिनी गांगुली यांचे निधन.
१९८८ : पंजाबी भाषिक कवी पाश यांचे निधन.
१९९१ : व्हिक्टोरिया क्रॉस सन्मानित भारतीय सैनिक प्रकाश सिंग यांचे निधन. (जन्म: ३१ मार्च १९१३)
२००७ : मराठी साहित्यिक श्रीपाद नारायण पेंडसे यांचे निधन.
२००८ : गणपत पाटील मराठी चित्रपट कलाकार (जन्म: १९१८?)
२०१० : भारतीय नक्षलवादी चळवळीचे जनक कानू सान्याल यांचे निधन.

# चिंच झोडपणी हंगाम सुरू ; चिंच फोडून बेरोजगारीवर मात

## दुष्काळी परिस्थितीत महिलांना रोजगार;लिंबागणेश परिसरातील चित्र

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात चिंच झोडणीचे काम जोरदार सुरू असुन चिंच फोडणीच्या कामामुळे ग्रामीण भागातील महिला मजुरांच्या हाताला काम मिळत आहे.चिंच फोडणीसाठी १२ रूपये किलो दर मिळत असुन एक महिला दिवसातुन २५ ते ३० किलो चिंच फोडणी करत असल्याने ३५० रुपयांपर्यंत रोजंदारी पडत असल्याचे वाघमारे यांनी सांगितले. शेतमजुर, महिला वर्ग आर्थिक संकटात असताना अशावेळी चिंच फोडणी कामाने महिलांच्या हाताला काम मिळाल्याने बेरोजगारीचा प्रश्न काही प्रमाणात मिटला आहे.

चिंचा झोडण्याचे काम फेब्रुवारी मध्ये सुरू होऊन मे महिन्यांपर्यंत संपते. या ४ महिन्यात ग्रामीण भागात यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते.झाडावर चढुन बांबुने झोडपुन चिंचा खाली पाडणे, पडलेल्या चिंचा वेचणे, त्यांच्यावरील टरफल बाजुला करणे,चिंचा फोडुन गर व चिंचोके वेगळे करणे आदी कामे कुटुंबातील महिला व मुले करतात. झाडांच्या फांदीवरून धोकादायक पद्धतीने झोडपणी करावी



लागते.गेल्या १५ वर्षांपासून आम्ही भावंडे चिंचा झोडण्याचा व्यवसाय करत असल्याचे लिंबागणेश येथील अजय परमेश्वर थोरात यांनी सांगितले.गेल्या वर्षीच्या मानाने यावर्षी चिंचाला बाजारभाव चांगला मिळत असुन नगर येथील व्यापारी जागेवर येऊन माल घेऊन जातात.फोडलेल्या चिंचेला प्रतिकिलो ११ रूपये बाजारभाव मिळतोय. यावर्षी चिंचेच्या झाडांना चिंचेचे प्रमाण कमी असल्याने यावर्षी आवक कमी प्रमाणात असल्याचे लिंबागणेश येथील चिंचेचे व्यापारी चंद्रकांत आवसरे यांनी सांगितले.फ



# प्राणी मित्रांच्या हल्ल्यासंदर्भात आंदोलनाला सुरुवात!

पाटोदा प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या शिरूर कासार तालुक्यातील भावी येथील ढाकणे पिता पुराना गंभीर मारहाण करून जिवे मारण्याचा प्रसंग घटल्याची घटना राज्य व गाजत असताना बीड सह राज्यभरातील राणी मित्रांनी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलनाला सुरुवात केली आहे राज्यभरातून प्राणिमित्रांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून संबंधितावर खडक कारवाई करून केंद्रीय तपासणी करणे मार्फत तपास करावा अशी मागणी करण्यात येत आहे. बीड जिल्ह्यातील खोक्यांचे प्रकरण राज्यभर गाजत आहे खोक्याच्या माध्यमातून शिरूर तालुक्यात धमाका घातल्या प्रकरणी खोकला अटक करण्यात आली आहे परंतु नंतर त्यांच्या तेवढी कडून आवाज उठवणाऱ्या वर धोका पोहोचू शकतो अशी भीतीही राणी मित्रांनी पोलीस विभागाकडे व्यक्त केलेले आहे.

या पार्श्वभूमीवर आज गुरुवारी मुंबईच्या आझाद मैदानाकडे बीड जिल्ह्यातील प्राणी मित्र दाखल झाले आहेत अन्य जिल्ह्यामधूनही प्राणिमित्र आझाद मैदानावर येत असून माननीय मुख्यमंत्री साहेबांना विनंती करून खोक्यासह पाठीराख्यांना केंद्रीय तपास यंत्रणासाठी आणि सीआयडीच्या मार्फत तपासणी करून कठोर कारवाई करावी यासह अन्य मागण्या संदर्भात हे आंदोलन करण्यात आल्याचे माध्यमांशी बोलताना उपस्थित प्राणी मित्रांनी सांगितले.

दरम्यान, हरीण ससे मोर अशा अन्य प्राण्यांच्या जीवाच्या रक्षणासाठी आणि या प्राण्यांची काळजी घेणाऱ्या राणी मित्रांना न्याय देण्यासाठी शासन आणि प्रशासनाने गंभीर दखल घेऊन संबंधित आरोपी आणि त्याच्या पाठीराख्यावर तपासणी करण्याच्या माध्यमातून तपास करून कठोर कारवाई करावी अशी मागणी राज्यभरातून जोर धरीत आहे.

# जीवाचीवाडी येथील जल जीवन पाणी पुरवठा योजन उपोषण स्थगीत



येवता। प्रतिनिधी

केज तालुक्यातील जीवाची वाडी येथे दोन वर्षापासून जल जीवन पाणी पुरवठा योजनेचे काम मंद गतीने चालू असल्याने सध्याची भिषण पाणीटंचाई विचारात घेता गावातील ग्रामस्थ भागवत चौरे सह जीवाची वाडी येथील हनुमान मंदिरावर दि.२० वेळ१०:००वा.पासुन आमरण उपोषणास बसले आहेत पंधरा दिवसात योजना कार्यनीतन करा उपोषन चालु होते त्याची दकल घेत उप अभियंता श्रीमती वंदना साळवे सह कर्मचारी उपोषन स्थळी हजर होऊन जल जीवन मिशन योजना जिवाची वाडी झालेल्या निकृष्ठ कामाची चौकशी मा.आयुक्त विभागीय कार्यालय,छत्रपती संभाजी नगर कार्यालय मार्फत चौकशी करण्याचे लिखी पत्रविल्याने तुर्तास स्थगीत करण्यात आले, उपोषनस्थळी उप अभियंता श्रीमती वंदना साळवे,भागवत चौरे,डिगांबर चौरे,गोकुळ सारूक,चौरे बि.के.आसाराम चौरे, डॉ.दादासाहेब चौरे,भागवतफुंदे,राजाभाऊ केदार,गोपाळ चौरे,शिवाजी चौरे, इत्यादी उपस्थित होते.उपोषण स्थळी पोलीस बंदोबस्त दिसून आला नाही आमच्या प्रतिनिधीने पोलीस निरिक्षक वैभव पाटील यांच्याशी भ्रम्हध्वनी वर संपर्क केला परंतु संपर्क केला त्यांनी पोलीस उपोषनस्थळी तैनात केलेचे सांगीतले, परंतु वास्तकी रात्रभर उपोषन कर्ते विना बंदोबस्ता एकटेच हनुमान मंदिरावर बसलेचे दिसले.

# विश्वजीत लगसकर याची भारतीय सैन्य दलात निवड

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील विश्वजीत केरबा लगसकर या युवकाची भारतीय सैन्य दलात जवान म्हणून निवड झाली असुन याबद्दल त्याचे सर्वजण अभिनंदन करत आहेत.



खरे तर मंदिरांचे गाव म्हणुन जशी युसूफवडगांवची ओळख आहे तशीच एक गावची दुसरी ओळख सुद्धा आहे ते म्हणजे सैनिकांचे गाव म्हणुन आजघडीला गावातील ७०/८० युवक भारतीय सैन्य दलात विविध पदावर असुन ते भारत मातेची सेवा करत आहेत.त्यामध्ये अजून एका युवकाची भर निवड झाली असुन गेल्या काही दिवसापुर्वी सैन्य भरती झाली होती याची काल मेरिट लिस्ट लागली असुन यात विश्वजीत केरबा लगसकर या युवकाची भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे त्याबद्दल त्याचा व त्याचे वडील केरबा लगसकर यांचा श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान व लोककल्याण ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने शाल श्रीफळ व श्रीराम मंदिर प्रतिकृती देवुन जाहीर सत्कार करण्यात आला यावेळी पतसंस्थेचे चेअरमन शिवराज खरबड,सहसचिव ज्योतिराम शिंदे संचालक शिवरुद्र चोपणे,मयूर खंडेलवाल,श्याम रोडगे,प्राचार्य बापुसाहेब भुसारी विकास जाधव,पत्रकार सचिन उजगरे,अनिल निकम,बाळासाहेब सपकाळ व इतर मित्र परिवार उपस्थित होता.

# जलप्रदूषण रोखणे काळाची गरज –काळे

पाटोदा । प्रतिनिधी

मानवाने नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर केला. अनेक वर्षे प्रचंड प्रमाणात जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभी केली. याचा दुष्परिणाम म्हणून भूगर्भातील जलपातळी खाली गेली. सद्यस्थितीत पृथ्वीतलावर पिण्यायोग्य अत्यल्प प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. प्रदुषित पाण्यामुळे जास्तीत जास्त रोग पसरतात हे ज्ञात असूनही स्वतःच्या स्वार्थासाठी आपण जलप्रदूषण करत आहोत. सजीवसृष्टी टिकवून ठेवण्यासाठी जलसंवर्धन करून जलप्रदूषण रोखणे अत्यंत आवश्यक आहे असे प्रतिपादन प्रोफेसर महादेव काळे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व भूगोल विभागांच्या संयुक्त विद्यमाने २२ मार्च रोजी जागतिक जल दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, उपप्राचार्य प्रोफेसर सतिश माउलगे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, भूगोल विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर चौधरी होते. प्रास्ताविकात डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी जागतिक जल दिनाचे महत्व स्पष्ट केले. प्राचार्यांच्या वतीने अध्यक्षीय समारोपात प्रा. अनिल जोगदंड म्हणाले की, शेतीमध्ये पाण्याचा अधिक गैरवापर होत आहे. शेतीत पाणी वाया जाणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. सध्याच्या रखरखत्या उन्हाळ्यात पशु–पक्ष्यांसाठी पिण्याच्या पाण्याची आपण घराबाहेर व्यवस्था करणे गरजेचे आहे. यानंतर सामुहिक जलप्रतिज्ञा घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. लक्ष्मण गाडेकर यांनी केले.

# एकमेव यश हे हजारो प्रश्नांवर उत्तर ठरलं –खुशबू नरुका

बीड। प्रतिनिधी

संघर्ष जिद्द चिकाटी संयम हे जेव्हा मिळून येतात तेव्हा यश हे लखलखत. हे फक्त आपल्याला वाचण्यातच पाहायला मिळत असते. पण याच जिवंत उदाहरण आज खुशबू नरूका यांनी राजस्थानलाच नव्हे तर भारत देशाला सुद्धा अनुभवायला मिळवून दिलं. प्राथमिक शिक्षण हे राजस्थानच्या शाळेमध्ये झाल्यानंतर खुशबू नरुका या २०२२ मध्ये दिल्ली येथे आल्या भारतामधली सर्वात अवघड समजली जाणारी यूपीएससी या परीक्षेतून जिल्हाधिकारी होण्यासाठी तीन वेळा प्रयत्न केले पण या प्रयत्नात त्यांना अपयश आलं. पण अखेर १९ मार्चला निकाल लागला आणि या डेप्युटी फील्ड ऑफिसर म्हणून यांची भारताच्या सेंट्रल सेक्रेटरी करून नियुक्ती झाली.

सण असो उत्सव असो कधीही आणि कितीही घरची आठवण आली तरीही आपली पदनियुक्तीच ही आपल्या परिवाराची सुखाची चावी आहे हे समजून कोणत्याही सण उत्सवाला न जाता खुशबू नका यांनी दिवस रात्र एक करून जिद्दीने तळमळीने अभ्यास केला. ''अगर हम अदृश्य है, तो समझिये हम असरदार है'' हे वाक्य त्यांनी खरं करून दाखवलं. वय वर्ष फक्त २७ यात अनेक वेळा



अपयश संघर्ष करावा लागला या अपयशातूनच समाजातील भिन्न विभिन्न विचारसरणी असणारे लोक यांचे टोमणे सुद्धा सहन करावे लागले पण आज तेच समाजातील लोक त्यांचा सत्कार करताना स्टेटस ठेवताना पाहायला मिळत आहेत. पण हा संघर्ष इथेच न थांबता अजूनही जिद्दीला पेटवून खुशबू नरूका तळमळीने यशाची गवसणी घालतील राजस्थानच्या या लेकीने राजस्थानमध्येच नव्हे तर महाराष्ट्रात देखील आणि भारतामध्ये सुद्धा आपल्या कर्तुत्वाने सर्वांच्या माना उंचावले आहेत. या शाबद्दल बीड शहरातील निवृत्त सहा पोलीस उपनिरीक्षक भागवत शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# माऊली गिरीच्या मारेकऱ्यांना कडक शासन करा–गिरी

## शिववंशिय द.गो.स.संस्थेच्या वतिने प्रशासनाकडे मागणी

गेवराई। प्रतिनिधी

धाराशिव जिल्ह्यातील भुम तालुक्यातील दुधोडी गावातील माऊली बाबासाहेब गिरी या युवकांची प्रेम प्रकरणातील संशयावरून दि.३ मार्च रोजी अमानुष हात्या करण्यात आली आहे यांचा सर्व समाजाच्या वतिने जाहीर निषेध व्यक्त होत असून माऊली गिरीच्या मारेक–यांना अटक करून फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी बीड जिल्हा शिववंशिय दसनाम गोसावी समाज संस्थेच्या वतिने दादासाहेब गिरी, गंगाधर पुरी, संतोष भारती,अनिल गिरी,अंबादास गिरी, दत्ता गिरी, विनायक गिरी,नाना पर्वत, गोरख पुरी,गोकुळ गिरी,श्रीराम गिरी, नारायण गिरी,राम भारती,लहू पुरी,राजेंद्र गिरी,सतीश बन, प्रल्हाद गिरी,भारत गिरी,अमर पुरी,ओम गिरी,आदिनी प्रशासनाकडे केली आहे.

याविषय आधिक माहीती अशी की धाराशिव जिल्ह्यातील भुम तालुक्यातील दुधोडी येथील माऊली बाबासाहेब गिरी यांची प्रेम प्रकरणातील संशयावरून अमानुष हात्या करण्यात आली या घटनेने महाराष्ट्रात हाळहाळ व्यक्त होत आहे तर महाराष्ट्रातील दसनाम गोसावी समाजांच्या वतिने ठिकठिकाणी निषेधार्थ उपोषण धरणे आंदोलन करण्यात येत असून जनतेत संताप व्यक्त होत आहे.

# प्रा.गोविंद जाधव यांना आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

## प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठलराव लहाने यांच्या हस्ते होणार सन्मान

घाटनांदूर । प्रतिनिधी

राजर्षी शाहू मल्टीपर्पज असोसिएशन लातूर व ढगेज्? कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा'आदर्श पत्रकार पुरस्कार' प्रा गोविंद जाधव यांना जाहीर करण्यात आला आहे पुरस्काराचे वितरण दिनांक २३ मार्च २०२५ रविवार रोजी प्लास्टिक सर्जन आदरणीय डॉ. विठ्ठलराव लहाने व सुप्रसिद्ध अभिनेते सुनिल गोडबोले यांच्या हस्ते मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह येथे होणार आहे. राजर्षी शाहू मल्टीपर्पज असोसिएशन लातूर व ढगेज्? कोचिंग क्लासेस अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आदर्श व्यक्तींना प्रतिवर्षी आदर्श



पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते


त्यात आदर्श शिक्षक, समाजरक्षक, उद्योजक, पत्रकार आणि समाजसेवक अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील प्रतिभावंत व्यक्तींना गौरविण्यात येते यंदाचा आदर्श पत्रकार पुरस्कार प्रा गोविंद राजाराम जाधव यांना जाहीर झाला असून त्यांना सन्मानचिन्ह,सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग सोपानराव ढगे , उपाध्यक्ष जी.डी. बनसोडे तसेच सचिव मिलिंद ढगे यांनी दिली आहे. आदर्श पत्रकार पुरस्कार मिळाल्याबद्दल गोविंद जाधव यांचे माजी जिल्हा अध्यक्ष शिवाजीराव सिरसाठ,सरपंच महेश आप्पा गारठे,उपसरपंच दत्ता काका जाधव,माजी सरपंच ज्ञानोबा बप्पा जाधव,माजी उपसरपंच बाळासाहेब देशमुख,डॉ डी वाय भारती, बाळासाहेब अरसुडे,प्रदीप कांबळे,गजानन मंदे,प्रकाश माले,सुरेश मिसाळ,मयूर जाधव,प्रा.मोदी,प्रा घुले,प्रा गंगने, प्रा सिरसाट,प्रा घुन्नर,प्रयोगशाळा सहाय्यक महादेव दौंड,विजय कांबळे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# शिरूरच्या राकेश पवार यांचा बेस्ट प्रिन्सीपल पुरस्काराने सन्मान

## किरण बेदी आणि सायना नेहवाल यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

मानूर। प्रतिनिधी

शिरूर शहरातील आयडियल इंग्लिश स्कूलचे प्रिन्सिपल राकेश धर्मराज पवार यांचा बेस्ट प्रिन्सीपल पुरस्काराने सन्मान करण्यात आला असून सदरील पुरस्कार पहिल्या महिला सनदी अधिकारी किरण बेदी आणि राष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू पद्मविभूषण सायना नेहवाल यांच्या हस्ते देण्यात आला.मुंबई मधील पवई येथे १८ मार्च रोजी हिरा नंदानी गार्डन मध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला असून राकेश पवार यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल शिरूर तालुक्याची शैक्षणिक क्षेत्रात मान उंचावली आहे.इंडियन टॅलेंट ओलॅम्पियाड या परिक्षेत गणित,विज्ञान आणि इंग्रजी या विषयामधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण कामगिरीवर आधारित शाळेची निवड करण्यात येत असून त्यासाठी बेस्ट प्रिन्सीपल पुरस्काराने सदरील शाळेच्या प्रिन्सिपलची निवड होत असते.देशभरातील जवळपास ४५७११ शाळांचा या परिक्षेत



सहभाग नोंदविला गेला होता.त्यामध्ये आयडियल इंग्लिश स्कूलचे एक हजार एकोनपन्नास विद्यार्थी सहभागी झाले होते.या विद्यार्थ्यांपैकी दोनशे सत्तर विद्यार्थी दुसऱ्या फेरीत पात्र ठरले होते.सदरील परिक्षेत विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सहकार्य करणाऱ्या शिक्षकांना अठरा हजार रुपयांचे रोख पारितोषिक मिळाले आहे.तर बेस्ट प्रिन्सीपल पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल राकेश पवार यांना सन्मानचिन्ह,प्रशस्तीपत्र आणि रोख वीस हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे.राकेश पवार यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे संस्थाचालक डॉ.भगवान सानप,अभिजीत डुंगरवाल,प्रकाश देसरडा, संतोष ढाकणे,विनोद डुंगरवाल,किरण देसर्डा राजेंद्र मंडलेचा,गणेश देशपांडे यांनी सर्व विद्यार्थ्यांसह अभिनंदन केले असून त्यांना मिळालेल्या पुरस्कारामुळे शिरूर तालुक्याची शैक्षणिक क्षेत्रात मान उंचावली गेली आहे.

### पुरस्काराची रक्कम शाळेला योगदान म्हणून दिली

प्राचार्य राकेश पवार हे गेल्या एक वर्षापासून प्रिन्सिपल म्हणून कार्यरत आहेत.त्यांना मिळालेले पुरस्काराचे वीस हजार रुपये त्यांनी शाळेच्या विकासासाठी दिले आहेत.ज्या मध्ये विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी सहकार्य करणाऱ्या शिक्षकांना दहा हजार,खेळाच्या साहित्यासाठी सात हजार आणि उर्वरीत तीन हजार रुपये सार्वजनिक प्रयोजनासाठी दिले आहेत.तसेच लोक कल्याणासाठी भगवान सिद्धेश्वराच्या चरणी एक लक्ष बिल्ब पत्र अर्पण करून ते अभिषेक करणार आहेत.

# प्राजक्ता धस यांच्या उपस्थितीत पाटोदा येथे नारी सन्मान सोहळा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा मराठी पत्रकार आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रा महिलांचा नागरी सन्मान सोहळा. उद्या होणाऱ्या कार्यक्रमास पाटोदा शहरातील जनतेने उपस्थित राहावे.उपस्थित राहावे. पाटोदा तालुका अध्यक्ष अजय जोशी.

उद्या होणाऱ्या पाटोदा मराठी पत्रकार परिषद च्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या करतो दोन महिलांचा नागरी सन्मान सोहळा रविवार दिनांक २३ ३२० रोजी सकाळी अकरा वाजता रेणुका माता मंदिर येथे पार पडणार असून या कार्यक्रमास अध्यक्ष उपस्थित राहणार आहे.प्राजक्ता ताई सुरेश धस संचालक महानंदा दूध संघ मुंबई. प्रमुख उपस्थिती वाशी मा.शेख . राधाताई महाराज सानप. संगीता ताई धासे. सौ दिपाली राजू भैय्या जाधव नगराध्यक्ष पाटोदा. पाटोदा तहसीलदार दत्तात्रय निरवाड. मुख्याधिकारी न प. पाटोदा. अभयजी जोशी. सोमनाथ जाधव पोलीस निरीक्षक पाटोदा. विशाल साळुंखे अध्यक्ष मराठी पत्रकार परिषद बीड. सर्व नगरपंचायत नगरसेवक सभापती पाटोदा. त्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडणार असून. पाटोदा शहरातील सर्व महिला व नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आव्हान मराठी पत्रकार परिषद पाटोदा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लोक न्यायालयामध्ये तडजोडी अंती मयताच्या वारसांना १ कोटी ८६ लाख रूपये नुकसान भरपाई

**बीड । प्रतिनिधी**

**येथील जिल्हा न्यायालयात आयोजित लोकन्यायालयामध्ये तडजोडी अखेरीस दोन अपघात मृत्यूतील व्यक्तीच्या वारसांना वारसांना एक कोटी ८० लाख रुपये नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली सोबतच इतरही प्रकरणी समेट घडवून आणण्यात आला.**



दिनांक २२ मार्च २०२५ रोजी बीड जिल्हा न्यायालयामध्ये लोक न्यायालय संपन्न झाले. सदरील लोक न्यायालयामध्ये मोटार अपघात प्रकरण क्र. ४२६/२०२१ (शितल भगवान पवार व ईतर विरूद्ध शिवाजी व ईतर) या प्रकरणात मा. न्यायालयासमोर तडजोड झाली व सदरील तडजोडीनुसार अर्जदार यांना गैरअर्जदार क्र. ४ लिबर्टी जनरल इंश्युरन्स कंपनी यांनी नुकसान भरपाईपोटी रक्कम रू.९०,००,०००/(अक्षरी नव्वद लाख रूपये) मंजुर केले. सदरील प्रकरणात तडजोड करणेकामी अर्जदार १. शितल भगवान पवार, २. खुशी भगवान पवार, ३. सावित्रीबाई भागवत पवार ४. भागवत रामु पवार व उक्कडपिंप्रीचे सरपंच गहिनीनाथ पालवे व अर्जदारांचे वकील ॲड. एम. आर. गर्जे, गैरअर्जदार क्र. ४ तर्फे कंपनीचे वतीने त्यांचे अधिकारी श्रद्धा किनारे मॅडम, आदित्य रायकर व कंपनीचे विधीज्ञ ॲड. आनंद दिलीप कुलकर्णी, ॲड. ए. पी. कुलकर्णी यांनी मोलाचे सहकार्य केले. मयत भगवान भागवत पवार हे सैन्य दलामध्ये शासकीय नौकरीस असल्यामुळे गैरअर्जदार क्र. ४ यांनी सदर बाबीचा विचार करून सदरची नुकसान भरपाईची रक्कम मंजुर केली. तसेच आज रोजीच्या न्यायालयामध्ये मोटार अपघात प्रकरण क्र. २४६/२०२२ (अर्चना धोडरे व ईतर विरूद्ध मिर्झा बेग व ईतर) या प्रकरणात मा. न्यायालयासमोर तडजोड झाली व सदरील तडजोडीनुसार अर्जदार यांना गैरअर्जदार क्र. ४ रॉयल सुंदरम इंन्शुरन्स कंपनी यांनी नुकसान भरपाईपोटी रक्कम रू.९६,००,०००/(अक्षरी शहान्नव लाख रूपये) मंजुर केले. सदरील प्रकरणात तडजोड करणेकामी अर्जदारांचे वकील ॲड. सतीश गाडे व गैरअर्जदार क्र. ४ तर्फे कंपनीचे वतीने कंपनीचे विधीज्ञ ॲड. ए. पी. कुलकर्णी यांनी सहकार्य केले. मयत दिनेश प्रल्हादराव धोंडरे हे शासकीय नोकरीस असल्यामुळे गैरअर्जदार क्र. ४ यांनी सदर बाबीचा विचार करून सदरची नुकसान भरपाईची रक्कम मंजुर केली.सदरील वरील दोन्ही प्रकरणातील तडजोड जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री यावलकर अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश पाटवदकर, जिल्हा विधी प्राधिकरण, बीड चे सचिव सोनी यांचे समक्ष करण्यात आली. दोन्ही पक्षकारांना आपली बाजु मांडण्यास संधी देवून दोघांचेही म्हणणे ऐकुन घेतले त्यांच्यातील वाद विकोपाला गेले असलेने त्यांना विवाहाचे महत्व समजावुन सांगितले. अनिल हा बिग बास्केट कंपनीमध्ये नोकरीस आहे. तसेच गिरीजा हिचे तंत्रशिक्षण झालेले आहे. त्यांच्या भविष्याकरिता त्यांनी एकत्र राहणे किती महत्वाचे आहे हे त्यांना समजावून सांगितले. दोन्ही पक्षकारांना सामाजिक भान लक्षात ठेवून संसार करण्यासाठी मार्गदर्शन केले. लोकअदालत पॅनल प्रमुखांनी केलेले मार्गदर्शन त्यांनी मनःपुर्वक ऐकुन घेतले व विवाह संबंध सुधारण्यास त्यांनी चांगला प्रतिसाद दिला व त्यांनी एकमेकांसोबत राहुन सुखाचा संसार करण्याचे ठरविले.प्रस्तुत प्रकरणात जिल्हा न्यायाधीश, अंबाजोगाई दिपक खोचे व संजश्री घरत यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर परेश वागडोळे यांचे अमुल्य सहकार्य लाभले. त्यांचे विधीज्ञ आणि वकील संघाचे सदस्य यांनीही पक्षकारांमध्ये तडजोड घडवून आणण्यास सहकार्य केले. उपस्थीत न्यायाधीश व वकील यांनी त्यांना पुढील सुखी संसाराच्या शुभेच्छा दिल्या. सर्वांच्या प्रयत्नाने व पक्षकारांच्या सहमतीमुळे एक मोडकळीस निघालेला संसार पुन्हा सुरळीत झाला.

### पुन्हा जुळल्या नात्यांच्या तारा

अनिल कुंडलीक गालफाडे व गिरीजा उर्फ पौर्णिमा अनिल गालफाडे यांचा विवाह दि. ३१ मे २००१ रोजी चिंमोली माळी, ता.केज, जि. बीड हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे झाला. लग्नानंतर काही दिवस त्यांचा संसार चांगला झाला. परंतु त्यानंतर त्यांच्यामध्ये वैयक्तीक मतभेद असल्याने किरकोळ कारणांवरून कारणावरून आपसामध्ये भांडण होवू लागले. गिरीजा ही अनिल याला सोडून माहेरी निघुन गेली. त्यांच्यातील आपसातील मतभेद वाढल्यामुळे त्यांनी घटस्फोटासाठी हिंदु विवाह अर्ज क्र. १९४/२०२३ हा या न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला. प्रस्तुत प्रकरणातील कथने विचारात घेवून तडजोडीकरीता आज दि. २२/मार्च २०२५ रोजी लोकन्यायालयात ठेवण्यात आले. लोकन्यायालयामध्ये पॅनल प्रमुख दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अंबाजोगाई माणिक वाघ यांनी व पॅनल सदस्य म्हणून विधिज्ञ बाळासाहेब लाड यांनी काम पाहिले. अर्जदारातर्फे विधिज्ञ विषाल घोबाळे व हनुमंत राउत यांनी काम पाहिले.

## सूर्याच्यावाडीच्या लाल मातीने मर्दांगी कुस्तीची परंपरा जोपासली– राजेंद्र मस्के

**बीड। प्रतिनिधी**

सूर्याचीवाडी ता.बीड येथे पिरबाबा दर्ग्याच्या यात्रेच्या निमित्ताने जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सूर्याचीवाडी येथील व परिसरातील हजारो नागरिक उपस्थित होते, या स्पर्धेमध्ये राज्यभरातून कुस्तीतील नामवंत पैलवान यांनी भाग घेतला होता, सूर्याचीवाडी हे गाव लोकसंख्येने कमी असले तरी महाराष्ट्रातील कुस्ती हा पारंपारिक व ग्रामीण खेळ जोपासण्याचे काम सूर्याची वाडी येथील ग्रामस्थांनी केले आहे,अतिशय उत्कृष्ट असे नियोजन व मोठ्या प्रमाणामध्ये कुस्तीतील भाग घेतलेल्या पैलवानांना बक्षीस देण्यात आले, कुस्ती हा खेळ लाल मातीत खेळला जातो ही लाल मातीतील कुस्तीची दंगल ग्रामीण भागातील नागरिकांना प्रेरणा देणारी असते, हा खेळ मर्दानी खेळ म्हणून या खेळाची ओळख आहे. एकास एक मल्य पैलवान हे आपले ताकदीच्या जीवावर व एकजुटीच्या जीवावर आपलं सर्वस्य पनाला लावून आपण या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस कसे पटकवतोल असे प्रयत्न करत असतात ,म्हणूनच लाल मातीतील या कुस्तीला मर्दानी खेळ असे ओळख निर्माण झाली आहे,असे मत राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले आहे. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक सह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लक्ष्मण पवारांकडून सोमवारी रोजा इफ्तारीचे आयोजन –याहिया खॉन

**गेवराई । प्रतिनिधी**

मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरु असुन सालाबादा प्रमाणे याही वर्षी ब मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार व पवार परिवारांच्या वतिने रोजागार मुस्लिम बांधवासाठी सोमवार दि.२४ मार्च सोमवाररोजी नगर परिषद छत्रपती शिवाजी महाराज सभागृह छत्रपती शिवाजीमहाराज चौक गेवराई येथे रोजाइफ्तारीचे आयोजन करण्यात आले आसल्याचे याहीया खॉन यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे

ते म्हणाले की रमजानच्या पाश्वभूमीवर रोजागार मुस्लिम बांधवासाठी विविध जातीधर्मातील नागरीक रोजाइफ्तारीचे आयोजन करण्याची परपंरा आहे परंपरेनुसार गेवराई शहरातील पवार कुटुंबाच्या दरवर्षी रोजाइफ्तार आयोजीत केला जात असून याही वर्षी दि.२४ मार्च सोमवाररोजी मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार व शिवराज बाळराजे पवार यांच्या वतिने रोजाइफ्तारचे आयोजन करण्यात आले आसल्यांचे याहिया खॉन यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.



## आष्टीत महेबुब शेख यांच्याकडून मुस्लिम बाधवांना इफ्तार पार्टी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या वतीने आष्टी तालुक्यातील मुस्लिम बांधवांसाठी शुक्रवार दि.२१ मार्च रोजी शहरातील ईदगाह मैदान येथे सायंकाळी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

सध्या मुस्लिम धर्मातील पवित्र रमजानचा महिना सुरू आहे. या महिन्यांच्या अखेरच्या टप्प्यात मुस्लिम बांधवांसाठी विविध राजकीय पक्षाकडून रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात येते. अशातच आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदारसंघाचे नेते तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पार्टीचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या वतीने देखील आष्टी तालुक्यातील व आष्टी,मुर्शदपुर शहर परिसरातील मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम वर्ष असून महेबुब शेख यांच्याकडून मुस्लिम बांधवांसाठी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

◀◀ पान ३ वर



## केंद्र सरकारने अनेक योजना शेतकऱ्यांसाठी दिल्या आहेत, त्याचा लाभ घ्या – आ.सुरेश धस

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी केंद्र सरकार व राज्य सरकारच्या ज्या योजना असतील त्या राबवत त्याचबरोबर नवीन नवीन उद्योग उभा करावीत शेतमाल तारण योजना करण्यासाठी गोडावुन बांधावा अशी प्रतिपादन आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आ. सुरेश (आण्णा) धस यांनी व्यक्त केले महाकिसान संघ कृषी प्रोड्यूसर कंपनी मार्फत सांगवी पाटण येथे शासकीय हमीभाव तूर खरेदी केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते ते बोलताना पुढे म्हणाले की सोयाबीनचा पेरा तालुक्यात हळूहळू वाढत चालला आहे दौलवडगाव ते हातोला सोयाबीन कडे वळतोय सोयाबीनचे उत्पादन वाढवणे आता गरजेचे झाले आहे तसेच शेतीवर आधारित उद्योग उभारणे ही आता काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.आ.सुरेश धस यांनी नवनाथ भगत यांचे कौतुक केले. फार मेहनती मुलगा आहे. त्याचं बरोबर सांगवी पाटण येथील आदित्य अशोक खिलारे यांची इंडियन आर्मी मध्ये निवड झाली त्याबद्दल सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून

आ.सुरेश आण्णा धस,ह.भ.प काशिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प सुदर्शन मुनी महाराज शिंदे, ह.भ.प अशोक महाराज भोसले, ह.भ.प आप्पा महाराज भगत, मा. शत्रुघ्न (बापू) मरकड, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्धव पवार, नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, शिवाजी नाकाडे,एन.टी भाऊ गर्जे, नवनाथ तरटे, सरपंच दत्तात्रय खोटे, अशोक गर्जे, सरपंच मनोज गाढवे, मुळीक सरपंच,संजय पवार, धनंजय तरटे,नामदेव काकडे, सरपंच मोहन आमटे, शेषराव गर्जे फौजी,सुंदरलाल गर्जे, डॉ.राम तरटे, सरपंच अभय गर्जे, बाबासाहेब भोसले,महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मॅनेजर सचिन औटे, एच.डी.एफ.सी बँकेचे मॅनेजर चौधरी, बद्रिनाथ तरटे, दत्तात्रय भोसले, जगन्नाथ खिलारे, आसराजी खिलारे,परसराम खिलारे, बबन जगताप, लक्ष्मण भोसले, फौजी,बशीर शेख, सय्यद मिस्तरी,डॉ. पुरुषोत्तम बावदानकर, बाळासाहेब भवर,भाऊसाहेब भवर, निलेश पोकळे, पत्रकार सुरेश कांबळे,

◀◀ पान ३ वर



## युवासेना व वाकणकर सिनर्जी अकॅडमीतर्फे ऑनलाईन मॉक टेस्टचे आयोजन

### विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा–युवासेना

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील युवकांच्या आणी युवतीच्या स्वप्नानां बळ देण्यासाठी युवासेना आणि वाकणकर सिनर्जी अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे व युवा खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातुन विदयार्थ्यांसाठी "ऑनलाईन मॉक टेस्ट २०२५" चे राज्यभरात आयोजन करण्यात आले आहे. या ऑनलाईन मॉक टेस्ट मध्ये बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा आणी जीईई मेन्स, एमएचटी सीईटी, आणि नीट या महत्वाच्या परीक्षांची तयारी आणखी मजबूत करून आपली स्वप्ने साकार करावीत असे आवाहन युवा सेना कार्यकारिणी सदस्य महाराष्ट्र राज्य तथा संपूर्ण मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे व युवासेना बीड लोकसभा सागर बहीर, युवासेना जिल्हा अध्यक्ष रविराज बडे ,युवासेना जिल्हा अध्यक्ष सुजीत शिंदे यांनी आवाहन केले आहे.

जीईई मेन्स, एमएचटी सीईटी, आणि नीट चे विद्यार्थी तरुण तरुणी ही मॉक टेस्ट घरबसल्या किंवा कुठल्याही ठिकाणावरून ही टेस्ट देऊ शकतात, तसेच कॉम्प्युटर, टॅब, अथवा मोबाईल याच्या माध्यमातून सुद्धा ही मॉक टेस्ट देऊ शकता ती सुद्धा अगदी मोफत, या परीक्षेचे वेळापत्रक : २६ मार्च, बुधवार – () तसेच ६ एप्रिल, रविवार – (/), तथा २० एप्रिल, रविवार रोजी – () असे वेळापत्रक असणार असून ही ऑनलाईन मॉक टेस्ट संपूर्णपणे युवा सेना

◀◀ पान ३ वर




## मच्छिंद्रगडाचा ४७ वा नारळी सप्ताह नांदेवाली येथे भव्य स्वरूपात साजरा होणार; तयारीला वेग

**मानूर । प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील ब्रम्हलीन संत निगमानंद महाराज यांच्या जन्मभूमी असलेल्या नांदेवाली गावात यंदा मच्छिंद्रगडाचा ४७ वा नारळी सप्ताह मोठ्या उत्साहात आणि भव्य प्रमाणात साजरा होणार आहे. मच्छिंद्रगडचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर यांच्या मार्गदर्शनाखाली २ एप्रिलपासून सप्ताहाला सुरुवात होणार असून त्याच्या तयारीला जोरदार वेग आला आहे. नांदेवाली गावासह संपूर्ण परिसरात या सप्ताहाच्या निमित्ताने उत्साहाचे वातावरण आहे.**

सप्ताहासाठी नांदेवाली गावाच्या मुख्य चौकाच्या पूर्वेला किर्तन मंडप,भोजन मंडप ;किचन मंडप, किचन शेड मंडप ,राहुटी मंडप, देवघर मंडप, नामजप मंडप ,मुख्य मंडपकथा–कीर्तन स्टेज यासह आसा भव्य मंडप डेकोरेशन आसे एकूण ९८ हजार चौरस फूट मंडप उभारणीचे काम वेगाने सुरू आहे.

भाविकांना बसण्यासाठी आणि कार्यक्रमांचा आनंद घेण्यासाठी पुरेशी व्यवस्था करण्यात येत असून मंडपाची सजावट आकर्षक पद्धतीने केली जात आहे. परिसराची स्वच्छता मोहीम हाती घेऊन स्वच्छतागृहे आणि पिण्याच्या पाण्याचीही सोय करण्यात येत आहे. विशेषतः कचरा व्यवस्थापनावरही भर देण्यात आला आहे. सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलिसांसह स्थानिक स्वयंसेवकांची विशेष टीम तैनात केली जाणार आहे. परिसरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे देखरेख ठेवली जाणार असून भाविकांच्या सुरक्षेचा प्राधान्याने विचार केला जात आहे. सप्ताहादरम्यान धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असणार असून नामवंत कीर्तनकार आणि प्रवचनकार आपल्या विचारांचे सादरीकरण करतील. स्थानिक गुनवान गायक वादक यांचे गायन करण्याची संधी मिळणार आहे. सप्ताहासाठी येणाऱ्या भाविकांसाठी २४ तास अखंड भोजन

◀◀ पान ३ वर





## अनिल जगताप फाउंडेशनकडून मंजेरी हवेली शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या वाटप!

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समाज कार्याला प्रभावित होऊन बीडमधील असंख्य तरुणांनी एकत्रित येऊन समाजसेवेचे कार्य करण्यासाठी अनिलदादा जगताप फाउंडेशनची स्थापना केली. या फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात दिला जातो. याबरोबरच समाजपयोगी उपक्रम राबविले जातात. अनिलदादा जगताप फाउंडेशनचे सचिव आकाश भैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पाली सर्कलमधील जिल्हा परिषद शाळा (मंजेरी हवेली) येथील विद्यार्थ्यांना दि. २१ मार्च २०२५ रोजी अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या वतीने वह्या वाटप करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तथा पालकांच्या उपस्थितीमध्ये अनिलदादा जगताप फाउंडेशनचे कार्यवाहक प्रतिक कांबळे यांनी या वह्या वाटप केल्या. जिल्हा परिषद शाळा मंजेरी हवेलीचे मुख्याध्यापक सय्यद सर आणि उपस्थित पालकांनी यांनी अनिलदादा जगताप फाउंडेशनचे आभार व्यक्त करत फाउंडेशनच्या समाजसेवेच्या कार्याचे कौतुक केले आणि अनिलदादा जगताप फाउंडेशनच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जयंत पाटील यांच्या भेटीवर अजित पवारांचा मोठा खुलासा

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व आमदार जयंत पाटील यांच्या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. यावर अजित पवार यांनी खुलासा केला आहे. ते म्हणाले, मीडियाने काय बातम्या लावाव्यात, हा त्यांचा प्रश्न आहे. पण वस्तुस्थिती पाहुन बातम्या द्या. आमची व्हीएसआयची बैठक होती. त्यासाठी मी आणि जयंत पाटील एकत्र आलो होतो. (-क्षळीं झुरी`प गरूपीं झरींळश्र)

व्हीएसआयच्या बैठकीत एआयचा महत्वाचा विषय होता. एआयचा फायदा होतोय. एआयचा वापर करणे काळाची गरज आहे. एआयचा वापर करुन उसाचे उत्पादन वाढले आहे. आम्ही त्याचा वापर फळबागा आणि इतर पिकांसाठी करणार आहोत.आजची नेहमीप्रमाणे बैठक होती,



असा खुलासा पवार यांनी केला. औरंगजेबच्या कबरीवरून सुरू झालेल्या वादावर माझी भूमिका स्पष्ट केली आहे. परत परत तेच मुद्दे काढू नका. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व जाती-धर्मांना एकत्र घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सह सर्व महापुरुषांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. आज आपल्यापुढे वेगळे प्रश्न आहेत. अशावेळी नको ते प्रश्न काढून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम कोणीच करू नये. कायदा सुव्यवस्था सांभाळण्याचा काम सर्वांचेच आहे. सरकारचे जास्त आहे. माझ्यासहित सर्वांनी हे केले पाहिजे. माझ्या मंत्र्यांनी वक्तव्य केले, तर मी त्यांना सांगेन, पण दुसऱ्या मंत्र्यांबाबत फडणवीस आणि शिंदेंच्या कानावर घालेन, असे पवार म्हणाले.

बीड प्रकरणामध्ये सर्व बाजूने तपास सुरू आहे. न्यायालयात हे प्रकरण आहे. सीआयडी आणि एसआयटी तपास करत आहे. पुढची कार्यवाही सुरू झाली आहे. दिशा सालीयन प्रकरणाच्या मी बातम्या वाचत आहे. अधिवेशनाच्या कामांमध्ये बिझी होतो वस्तुस्थितीला धरून बोलले पाहिजे. तुम्ही पण वस्तुस्थितीला धरूनच बातमी दिली पाहिजे. तिचे वडील न्यायालयामध्ये गेले आहेत, न्यायालय काय तो निर्णय देईल, असे पवार म्हणाले.

## पुण्यातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नियंत्रण पोलिसांकडेच; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**



पुण्यातील सीसीटीव्ही प्रकल्प टप्पा १ मधील उभारलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दुरुस्ती मे. अलाईड डिजिटल सर्व्हिस लिमीटेड या आस्थापनांकडे असून हे आस्थापन कुठलीही तक्रार आल्यास तात्काळ दुरुस्ती करते. पुणे शहरात एकूण ५१५१ आणि पुणे शहर पोलीस यांचे १३४१ असे एकूण ६४९२ सीसीटीव्ही आहेत. कॅमेऱ्यांचा स्विकारण्याकामी पुणे पोलीस नियंत्रण कक्ष तसेच संबंधित पोलीस ठाणे, पोलीस चौकी स्तरावर उपलब्ध करून दिलेला आहे, असे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विधानसभेत लेखी उत्तरात स्पष्ट केले.

यासंदर्भात सिद्धार्थ शिरोळे यांनी विधानसभागृहाचे लक्ष वेधले होते. यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले, पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून २०१५ मध्ये टप्पा क्र. १ मधून १३४१ सीसीटीव्ही बसवण्यात आले आहेत. टप्पा २ मधून २८८६ अतिरिक्त कॅमेऱ्यांना मान्यता दिली असून त्याचे काम चालू आहे. टप्पा २ मधील कॅमेऱ्यांची दुरुस्ती व देखभालीसाठी ६ वर्षांची मुदत आहे. याचे काम मे. अलाईड डिजिटल सर्व्हिस लिमीटेड या कंपनीकडे आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाकडून उभारणी केलेले कॅमेऱ्यांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास त्याची दुरुस्ती करण्यात पुणे पोलीस दलाचे स्वतंत्र असे नेटवर्क नाही, असेही त्यांनी नमूद केले आहे. पुणे शहर पोलीस विभागाकडून टप्पा १ आणि २ मध्ये उभारण्यात आलेले कॅमेरे भारत संचार निगम लिमिटेड यांच्याकडून इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणून कार्यरत आहे. पुणे मेट्रोकडून २२५५ तसेच पुणे स्मार्ट सिटीकडून ४३० कॅमेऱ्यांची उभारणी करण्यात आली आहे, अशीही माहिती त्यांनी दिली.

## हिंजवडी पोलिसांची वाहतूक कंपन्यांना तंबी

**पिंपरी । प्रतिनिधी**

हिंजवडी येथे घडलेल्या जळीत प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर हिंजवडी पोलिस ठाण्याने हिंजवडी परिसरातील कंपन्यांना वाहतूक सेवा पुरविणार्या कंपन्यांच्या प्रतिनिधींना बोलावून बैठक घेतली. चालकाचे मानसिक आरोग्य सांभाळा, चालकाच्या वर्तनातील बदल ओळखायला शिका, आगीची किंवा इतर अपघाताची घटना घडल्यास काय खबरदारी बाळगावी याचे प्रशिक्षण द्यावे, अशा प्रकारच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, हिंजवडी येथे बुधवारी (१९ मार्च) एका कंपनीच्या टेम्पो ट्रॅव्हलर वाहनाला आग लागून चार जणांचा होरपळून जागीच मृत्यू झाला. तर, सहा जण गंभीर जखमी झाले. वाहनातील शॉर्ट सर्किटमुळे हा अपघात घडला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला होता. मात्र, पोलिसांनी केलेल्या तपासात वाहनावरील चालकानेच जुन्या रागातून हा प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. हिंजवडी परिसरात शेकडो आयटी कंपन्या आहेत. या कंपन्यांमध्ये हजारो कर्मचारी काम करतात. तीन शिफ्टमध्ये या कंपन्यांचे काम चालते. त्यामुळे कर्मचार्यांना प्रवासासाठी वाहतूक कंपन्यांकडून किंवा कपंनीच्या स्वत:च्या वाहनांद्वारे प्रवासी सेवा पुरविली जाते. बुधवारी घडलेल्या घटनेमुळे या वाहनांमधून प्रवास करणार्या कर्मचार्यांच्या सुरक्षीततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे ही घटना घडल्यानंतर हिंजवडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कन्हैय्या थोरात यांनी गुरुवारी (२० मार्च) तातडीने वाहतूकसेवा पुरविणार्या कंपनींच्या प्रतिनिधींची बैठक बोलावली. ३५ कंपन्यांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते

## वाघोलीतील कोयता गँगमधील चार जण दोन वर्षासाठी पुणे जिल्ह्यातुन हद्दपार

**वाघोली । प्रतिनिधी**

वाघोली पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील व कोयता गँग मधील चार गुन्हेगारांना दोन वर्षासाठी पुणे जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. रोहन ऊर्फ मोन्या रामप्यारे गिरी (वय-२-वर्षे), विकास राजु जाधव (वय-२० वर्षे), आदित्य दिपक कांबळे (वय-१८ वर्षे ३ महिने),




वैभव सुभाष पोळ वय (१८ वर्षे ३ महिने) (सर्व रा. वाघोली) अशी चौघांची नावे आहेत.

वाघोली बाजारतळ तसेच आसपासच्या भागात कोयत्याच्या सहायाने दहशत निर्माण करीत होते. गंभीर दुखापत व तोडफोड करुन लोकांना कायम दहशतीखाली ठेवुन त्यांना वारंवार त्रास देत होते. वाघोली पोलीस ठाण्याने त्यांच्या हद्दपारीचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त हिम्मत जाधव यांच्याकडे पाठविला होता. त्यांनी हद्दपारीचा आदेश काढला.

वरिष्ठ पोलिस निरीक्षक पंडित रेजितवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक वैजिनाथ केदार, पोलिस कर्मचारी दर्शन देवगडे, प्रशांत कर्णवर, प्रदिप मोटे पोलीस अंमलदार सागर कडू, कमलेश शिंदे, महादेव कुंभार, साई रोकडे, पांडुरंग माने, विशाल गायकवाड, दिपक कोकरे, प्रितम वाघ, गहिनीनाथ बोयणे, समीर बोरडे यांनी ही कामगिरी केली.

## गांजा विक्री करणाऱ्यांना ठोकल्या बेड्या; लोणी काळभोर पोलीसांनी सापळा रचून पकडले

**लोणी काळभोर । प्रतिनिधी**

लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीतील माळी मळा परिसरात गांजाची विक्री करण्यासाठी आलेल्या तिघांना लोणी काळभोर पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून १९ हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे. शुभम बानु पालखे (वय २२, रा. दत्तमंदिर जवळ, १५ नंबर, जुना कॅमल शेजारी, हडपसर, पुणे), मयुर विलास बोरकर (वय २५, रा. सर्वे नंबर ५. वेताळबाबा वसाहत,



ग्लायडींग सेंटर जवळ, हडपसर, पुणे) व अमन महंमद रफिक कोतवाल वय २७, रा. विठ्ठल मंदिराजवळ, माळवाडी, हडपसर, पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस हवालदार प्रदीप क्षीरसागर यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस हवालदार प्रदीप क्षीरसागर हे शुक्रवारी (दि. २१) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. गस्त घालत असताना, पोलिसांना माळी मळा परिसरात तिघेजण गांजाची विक्री करण्यासाठी येणार आहेत, अशी माहिती एका खबऱ्या मार्फत मिळाली. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी सापळा रचून तीन संशयितांना ताब्यात घेतले.

आरोपींची झडती घेतली असता, त्यांच्याकडील एका काळया रंगाच्या कॅरीबॅगीत १९ हजार रुपयांचा ९३० ग्रॅम वजन असलेला गांजा मिळाला. याप्रकरणी आरोपींच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ आणि मानसोपचार विषयक पदार्थ कायदा २० व भारतीय न्याय संहिता कलम ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

## युवक काँग्रेसमधील गटबाजी चव्हाट्यावर; नव्याने केलेल्या सर्व नियुक्त्या रद्द

**पुणे । प्रतिनिधी**

युवक काँग्रेसलाही गटबाजीचे ग्रहण लागले आहे. प्रदेश शाखेच्या नव्याने करण्यात आलेल्या सर्व नियुक्त्या अखिल भारतीय युवक काँग्रेसने अवघ्या ८ तासांमध्ये रद्द केल्या आहेत. त्याबरोबरच ज्यांनी कोणी या नियुक्त्या केल्या त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. विद्यमान प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत व अखिल भारतीय युवक काँग्रेसचे पदाधिकारी यांच्यातील मतभेद यातून उघड झाले आहे. प्रदेश युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये आता कोणामागे रहायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे.



राऊत यांची प्रदेशाध्यक्षपदाची मुदत लवरच संपुष्टात येत आहे. त्यांची संमती नसताना केंद्रीय युवक काँग्रेसने राज्यासाठी कार्याध्यक्ष या पदाची निर्मिती करून त्यावर नियुक्तीही केली. राऊत यांना ही नियुक्ती मान्य नव्हती. तेव्हापासूनच मतभेदांची सुरूवात झाली. त्याचा परिणाम युवक काँग्रेसने जाहीर केलेल्या विधानसभेला घेराव या कार्यक्रमावर झाला. लाल महाल (पुणे) ते विधानसभा अशी ५ दिवसांची पदयात्रा करून हा घेराव घालण्यात येणार होता. मात्र पुण्यातच ही यात्रा अडवण्यात आली. त्यानंतर पुढे या यात्रेचा सगळा उत्साहच संपला. विधानसभेचा घेरावही कसाबसा पार पडला. यात्रेतून मधूनच अनेक कार्यकर्ते गायब झाले. काँग्रेसच्या बड्या नेत्यांनीही या यात्रेकडे फारसे लक्ष दिले नाही.

कुणाल राऊत यांनी अचानक गुरूवारी रात्री नागपूरातून प्रदेश युवक काँग्रेसच्या नव्या नियुक्त्या जाहीर केल्या. यात २० प्रदेश उपाध्यक्ष, ८ कार्याध्यक्ष व अन्य अनेक नियुक्त्या होत्या. केंद्रीय समितीच्या नियमांप्रमाणे प्रदेशाध्यक्षांसह कोणालाही कसलीही नियुक्ती करायची असेल तर त्यासाठी केंद्रीय समितीची मान्यता लागते. राऊत यांनी अशी कोणताही मान्यता घेतली नव्हती. त्यामुळे केंद्रीय समितीने तातडीने दिल्लीहून पत्रक प्रसिद्ध करून फक्त ८ तासांमध्ये या सर्व नियुक्त्या रद्द करून टाकल्या. केंद्रीय समितीमध्ये राष्ट्रीय सचिव असलेल्या एहसान खान, कुमार रोहित, अजय चिंकारा यांच्या या पत्रकावर स्वाक्षऱ्या आहेत. याच पत्रकात त्यांनी कोणत्याही मान्यतेशिवाय कोणाचीही नियुक्ती करणे ही गंभीर व शिस्तभंग करणारी गोष्ट आहे असे म्हटले आहे. तसेच ज्यांनी कोणी या नियुक्त्या केल्या, त्याचा शोध घेऊन संबधितांवर कारवाई केली जाईल असा इशाराही दिला आहे.

## श्री विघ्नहर साखर कारखान्याला नॅशनल फेडरेशनकडून उत्कृष्ठ ऊस विकास पुरस्कार जाहीर

**ओझर । प्रतिनिधी**



जुन्नर तालुक्यातील श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा पारदर्शक कारभार आणि शेतकरी हिताचे निर्णय तसेच सभासद, ऊस उत्पादकांच्या असलेल्या विश्वासाच्या जोरावर विघ्नहर कारखान्याने आपली पुरस्कार मिळविण्याची परंपरा कायम राखली असून गळीत हंगाम २०२३-२४ करीता नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लि.,नवी दिल्ली यांचा उच्च साखर उतारा विभागातील प्रथम क्रमांकांचा उत्कृष्ठ ऊस विकास हा पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती चेअरमन सत्यशिल शेरकर यांनी दिली.

चेअरमन सत्यशिल शेरकर म्हणाले की, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याने साखर कारखानदारी संबंधीत विविध संस्थांचे आतापर्यंत ६३ पुरस्कार मिळविलेले असून यंदाच्या मिळालेल्या या पुरस्काराने विघ्नहरला मिळालेल्या एकूण पुरस्कारांची संख्या ६४ झाली असल्याचे ते म्हणाले. विघ्नहरने २०२३-२४ चे गळीत हंगामात १० लाख २३ हजार ४२५ मे. टन ऊसाचे गाळप केले असून ११ लाख ५० हजार क्विंटल साखर पोत्यांचे उत्पादन झाले आहे. तर ११.६३ % साखर उतारा राखण्यात यश मिळविले आहे. तसेच सहवीज निर्मीती प्रकल्पातून ४ कोटी १२ लाख ६३ हजार २०० युनिट वीज निर्यात केली. कारखान्याचा विस्तारीत डिस्टीलरी प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु असून डिस्टीलरी प्रकल्पातून ९५ लाख १७ हजार ८३९ लिटर अल्कोहोलची व ७० लाख ७९ हजार ७५८ लिटर इथेनॉल निर्माती झाली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, हंगाम २०२५-२०२६ साठी पुरेसा ऊस उपलब्ध होण्याकरीता लागवड हंगाम २०२४-२०२५ मध्ये ऊस लागवडीचे धोरण १ जून-२०२४ पासून सुरु असून विघ्नहर कारखान्यामार्फत ऊस विकास अभियान मोठ्या प्रमाणात राबविले जात असल्याचे ते म्हणाले. या अभियानांतगत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उधारी तत्वावर ऊस बेणे व ऊस रोपांचा पुरवठा केला जात आहे. ऊस लागवड व कारखान्याकडे ऊसाची नोंद झालेनंतर प्रति एकरी ऊस उत्पादन वाढीसाठी प्रत्यक्ष ऊस उत्पादकांच्या बांधावर जावून मार्गदर्शन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

## ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. विजय केळकर यांना यंदाचा पुण्यभूषण पुरस्कार जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

२०२५ चा पुण्यभूषण पुरस्कार डॉ. विजय केळकर यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या अर्थक्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना पुण्यभूषण पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. त्यांना हा पुरस्कार देण्याचा निर्णय ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने घेतला आहे, अशी माहिती पुण्यभूषण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.



यंदाचे पुण्यभूषण पुरस्कार सोहळ्याचे हे ३७ वे वर्ष असून मोठ्या दिमाखदार पद्धतीने पुण्यभूषण पुरस्कार सोहळा पार पडणार आहे. तसेच या सोहळ्यात कर्तव्य बजावत असलेल्या जखमी झालेल्या चार वीर जवानांचा आणि एका वीरमातेचा गौरव करण्यात येणार आहे. बालशिवाजींची, सोन्याच्या फाळाने पुण्याची भूमी नांगरत असलेली प्रतिकृती आणि या नगरीच्या ग्रामदैवतांची प्रतिमा यांचा समावेश असलेले स्मृतिचिन्ह आणि त्याचबरोबर दोन लाख रूपये रोख रकमेची थैली असे स्वरुप या पुस्काराचे असणार आहे.

पुण्यभूषण पुरस्कारार्थींचे नावे मा. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, उपराष्ट्रपती हमीद अन्सारी, व्यंकय्या नायडू, माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, सभापती सोमनाथ चटर्जी, मनोहर जोशी, शरद पवार, स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर व क्रिकेटपटू कपिल देव आणि सचिन तेंडूलकर, पांडुरंगशास्त्री आठवले, विलासराव देशमुख, ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार, सिताराम येचुरी, गिरीश कर्नाड, ज्येष्ठ महेश एलकुंचवार, विकास आमटे, आशा भोसले, शरद यादव, नितीन गडकरी, पं. हरिप्रसाद चौरासिया, पं. अमजद अली खान, पं. शिवकुमार शर्मा, प्रफुल्ल पटेल, ज्येष्ठ अभिनेत्री शर्मिला टागोर, ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर, पद्मविभूषण नारायण मूर्ती आदी मान्यवरांना पुण्यभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

## तलाव पूर्ववत करण्याच्या मागणीसाठी मनसेचे आंदोलन

**किवळे । प्रतिनिधी**

दुरुस्तीच्या नावाखाली चार वर्षांपासून बंद असलेला निगडी प्राधिकरणातील छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव पूर्ववत सुरू करण्याच्या मागणीसाठी मनसेने पालिका क्रीडा विभागाच्या विरोधात धरणे आंदोलन केले.

महापालिकेने पंधरा दिवसांत जलतरण तलाव सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले. निगडी, आकुर्डी, प्राधिकरण, रावेत आणि बिजलीनगर या भागांतील नागरिकांसाठी छत्रपती शिवाजी महाराज जलतरण तलाव म्हणजे जलतरण प्रशिक्षण घेण्यासाठी महत्त्वाचे केंद्र. परंतु, २०२० मध्ये कोरोनाच्या सावटाखाली हा तलाव बंद करण्यात आला आणि त्यानंतर तो सुरू करण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलण्यात आली नाहीत.

पालिकेकडे वारंवार अर्ज करूनही नागरिकांना फक्त आश्वासनांवर समाधान मानावे लागत होते. उन्हाळ्यात शालेय विद्यार्थ्यांना जलतरण प्रशिक्षण मिळावे, नागरिकांना आरोग्यासाठी जलतरणाचा लाभ मिळावा, अशी आंदोलकांनी भूमिका घेतली. डा विभाग कार्यालयासमोर मनसेने धरणे आंदोलन करत पालिका अधिकाऱ्यांना जाब विचारत जलतरण तलाव सुरू करण्याची मागणी केली.

उपायुक्त पंकज पाटील आणि मुख्य क्रीडा अधिकारी अनिता केदारी यांना निवेदन देण्यात आले. यावर पालिकेने १५ दिवसांत तलाव सुरू केला जाईल, अशी लेखी स्वरूपात आश्वासन दिले. या आंदोलनात शहर उपाध्यक्ष बाळा दानवले, विभाग अध्यक्ष मयूर चिंचवडे, जयसिंग भाट, भागवत नागपुरे, विक्रांत मुकणार, ओंकार उकिरडे, अमरसिंग हिरे उपस्थित होते.

## अपहारप्रकरणी विश्वजित जाधवला अटक

**पुणे । प्रतिनिधी**

फर्ग्युसन रस्त्यावरील हॉटेल वैशालीचे दिवंगत मालक जगन्नाथ शेट्टी यांच्या कन्या निकीता शेट्टी यांच्या बनावट स्वाक्षर्या करून चार कोटी ९३ लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी जावई विश्वजित जाधवला पुणे पोलिसांनी अटक केली. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने विश्वजित जाधवसह तिन्ही आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. त्यामुळे विश्वजित जाधव शुक्रवारी (दि. २१) दुपारी पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेत हजर झाला. न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने त्याल रविवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.



या प्रकरणी निकीता जगन्नाथ शेट्टी (वय ३४, रा. मोदीबाग) यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. विश्वजित जाधवने निकीता शेट्टी यांची मोदीबागेतील सदनिका तारण ठेवून त्यांच्या खोट्या स्वाक्षर्या आणि बनावट शिक्का वापरून पाच कोटी रुपयांचे कर्ज काढले. त्यापैकी ४ कोटी ९३ लाख रुपये स्वतःच्या बँक खात्यात वळते केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार, विश्वजित विनायकराव जाधव (वय ४१, रा. घोले रस्ता), आर. आर. फायनान्सचा रवी रामचंद्र परदेशी (रा. हांडेवाडी रस्ता, सातवनगर) आणि कोटक महिंद्रा बँकेच्या येरवडा शाखेचा व्यवस्थापक राजेश देवचंद्र चौधरी (वय ४२, रा. येरवडा) यांच्याविरोधात फसवणुकीसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ७ डिसेंबर २०२२ ते ३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत नामदार गोपाळ कृष्ण गोखले रस्त्यावरील निकीता हॉस्पिटॅलिटी एलएलपीच्या कार्यालयात घडली. त्यानंतर विश्वजित जाधव पोलिसांकडे हजर झाला असून, अन्य दोघांचा शोध घेतला जात आहे. कौटुंबिक वादातून हे प्रकरण दाखल करण्यात आले आहे. यापुर्वीच तीन एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. मागील दीड वर्ष उच्च न्यायालयाने अंतरिम जामीन दिला आहे. यादरम्यान, विश्वजित याकडे कोणतीही चौकशी अथवा तपास झाला नाही. याबाबत पोलिसांना पत्रही दिले. मात्र, तेव्हा काही केले नाही. त्यामुळे कोठडीची गरज नसल्याचा युक्तिवाद अ‍ॅड. पुष्कर दुर्गे यांनी केला.